नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक २१९ * * अकोला * बुधवार, दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## मोदीं, राजनाथ सिंहकडून शरद पवारांची चौकशी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार सध्या पुण्यातील रुबी रुग्णालयात उपचार घेत आहेत. प्रकृती अस्वस्थ झाल्यामुळे त्यांना बारामतीहून पुण्यात हलवण्यात आले होते. रुग्णालयात दाखल झाल्यानंतर त्यांच्यावर विविध वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या.

या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी सकाळी शरद पवार यांना फोन करून त्यांच्या तब्येतीची विचारपूस केल्याची माहिती सूत्रांनी दिली. तसेच केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनीही फोन करून प्रकृतीची चौकशी केली. देशातील दोन वरिष्ठ नेत्यांनी थेट संपर्क साधल्यामुळे या घटनेला राजकीय वर्तुळातही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## चांद्याचा वांधा




दै. महासागरने याच स्तंभातून दहा दिवसांपूर्वी जे चांद्याविषयी भाकीत वर्तवले होते. ते तसेच्या तसे तेथील भांडखोर नेत्यांनी खरे करून दाखवले. पूर्वी चंद्रपूरला चांदा असे म्हणत. त्यामुळेच चंद्रपूर म्हणजे 'चांद्यातील वांधा' कशामुळे झाला याची खबरबात घ्यावी लागेल. एकेकाळी महाराष्ट्रासह देशावर राज्य करणाऱ्या राजकीय पक्षाचे सध्या जे काही धिंडवडे निघत आहेत ते बघितल्यावर त्यांची कीव करावी की त्यांच्यावर हसावे हेच समजत नाही. निवडणुकीचा निकाल लागला त्या दिवशी काँग्रेसचे बडे नेते चंद्रपूरचे विजय वडेट्टीवार यांना जणू हर्षवायू झाला होता. त्यानंतर खासदार धानोरकर गट आणि आमदार वडेट्टीवार गट दोन्ही जोरजोरात गटांगळ्या खात होते. आपल्या भांडण्यामुळे आपण आपल्याच पायावर धोंडा मारून घेत आहोत हे त्यांना समजत होते पण उमजत नव्हते. चंद्रपुरातील भाजपचे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी आपलाच महापौर होईल असे जाहीर केले होते. त्यांनी मित्रपक्षाच्या सहाय्याने चंद्रपूरची महानगरपालिका आपल्या ताब्यात येईल असे सांगितले. नेहमीप्रमाणे निर्णय घेण्यासाठी घोळ घालत जास्त वेळ गेल्यामुळे उबाठा शिवसेनेने अखेर भाजपबरोबर घरठाव केला आणि अडीच वर्षांसाठी महापौरपद मिळवून घेतले. त्यामुळेच चांद्यामध्ये म्हणजे चंद्रपुरात आज भारतीय जनता पक्षाचा महापौर निवडून आला आहे. वर्षभरात भारतीय जनता पक्ष किती प्रगती करतो, किती नगरसेवक आपल्याकडे वळवू शकतो हे आम्हाला ठाऊक नाही. पण एक गोष्ट मात्र नक्की आहे की, आता पुढील पाच वर्षे सर्वाधिक सदस्य संख्या असलेल्या काँग्रेसला चंद्रपुरात स्थान मिळणार नाही. यालाच म्हणतात दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ. वडेट्टीवार आणि धानोरकर यांच्यात हाडवैर आहे हे सर्वांनाच ठाऊक होते. महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे स्वच्छ चरित्र आणि उत्तम चारित्र्याचे नेते आहेत. त्यांनी सर्वकाही सूचना देऊनही दोन्ही पक्षांना सत्तेत वाटा मिळेल असा तोडगा काढला होता. पण या दोघांनाही आपला महापौर बनवण्यासाठी इतर पक्षांची मदत लागणार आहे आणि त्याकरिता प्रयत्न करावे लागतील, त्यांना पदे द्यावी लागतील हे नेहमीप्रमाणे कळवलेही नाही आणि त्यामुळेच जमलेही नाही. काँग्रेसचे दोन्ही गट सत्ता कशी काँग्रेसच्या हाती राहणार नाही याचीच कवायत करताना दिसत होते. काठावरचे बहुमत असताना किंवा नसताना जो लवचिकपणा लागतो किंवा जे आश्वासन कौशल्य आणि धोरणीपणे केली जाणारी मुत्सेद्देगिरी लागते त्या बाबतीतला काँग्रेसकडील साठा संपलेला दिसतो आहे. दिल्लीत बसून राहुल गांधी किंवा मल्लिकार्जुन खर्गे आणि महाराष्ट्रातील प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी कोणतेही आदेश दिले. तरी त्याप्रमाणे आपण पाऊल टाकायचेच नाही, असे ठरवलेल्या धानोरकर गट आणि वडेट्टीवार गट या दोन्ही गटांना आता आपल्या कटकारस्थानीपणाचे बक्षीस मिळालेले आहे. ते बक्षीस शिरावर घेऊन दोन्ही गटांनी आपला कुप्रसिद्ध धांगडधिंगा यापुढेही आनंदाने सुरू ठेवावा आणि भारतीय जनता पक्षाने ढोल लावून नृत्य करीत सत्तानंदाचा हा भांगडा मनसोक्त उपभोगावा हीच काँग्रेसला श्रद्धांजली ठरेल.

*'तुज वनराजा काय ग्रहदशा आली, सत्ताही पराजित झाली*
*आता जंगलात वेचु गोवऱ्या, सावरू कसा रे सावऱ्या'*

या ओळींमध्येच काँग्रेसच्या पानिपताचे रहस्य दडलेले आहे. काँग्रेसच्या गलथानपणावर एखादा चित्रपट काढण्याचे ठरले तर त्यात चंद्रपूर कांडाचाही उपयोग नक्कीच करावा, त्यामुळे निर्मात्याला गडगंज फायदा होईल.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

## ई-मेल नोटीसला मान्यता

### अजितदादांच्या आठवणींत कॅबिनेट : तीन मोठ्या निर्णयांवर फडणवीसांचे शिक्कामोर्तब

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
पक्षकारांना इलेक्ट्रॉनिक मेलद्वारे नोटीस बजावण्याला कायदेशीर मान्यता देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडलेला हा प्रस्ताव मंत्रिमंडळाने मान्य केला.



महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील संबंधित कलमात सुधारणा करून ई-मेलद्वारे नोटीस पाठवण्याची पद्धत कायदेशीर करण्यात आली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम २३० मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या बदलामुळे महसूल सुनावणीस असलेली जमीनविषयक अनेक प्रकरणे जलदगतीने निकाली काढणे शक्य होणार आहे. डिजिटल माध्यमातून नोटीस देण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होईल आणि वेळेची बचत होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज १० फेब्रुवारी रोजी राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. बैठकीच्या सुरुवातीलाच दिवंगत अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. राज्याचे मुख्य सचिव यांनी शोकप्रस्ताव वाचून दाखवला. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची मंत्रिमंडळात औपचारिक ओळख करून देत त्यांचे स्वागत केले. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते.

बैठकीत अजितदादांनी निधनापूर्वी पाठपुरावा केलेल्या तीन महत्त्वाच्या विषयांवर तातडीने निर्णय घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मुद्द्यांना प्राधान्य देत संबंधित प्रस्तावांना मंजुरी दिली. या बैठकीत बारामती क्रीडा संकुलासाठी ७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. बारामतीतील क्रीडा सुविधांच्या विकासासाठी हा निधी वापरण्यात येणार आहे. वालचंदनगर परिसरात एमआयडीसी उभारण्यासाठी १ हजार एकर जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

### ११ अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती होणार

राज्यात प्रशासनिक कामकाजाला गती देण्यासाठी ११ अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. महसूलमंत्र्यांकडे या विषयावर अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी पाठपुरावा केला होता. त्यांच्या सूचनेनुसार प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

नागपूर जिल्ह्यातील मौजा लिंगा (ता. कळमेश्वर) येथे कोल टू केमिकल प्रकल्पासाठी ११७ हेक्टर १९ आर जमीन एमआयडीसीला उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. अकोला जिल्ह्यातील पिंपळशेंडा (ता. मुर्तिजापूर) येथील लघू पाटबंधारे प्रकल्पाच्या ६ कोटी ६० लाख रुपयांच्या दुरूस्ती अंदाजपत्रकास मंजुरी. यामुळे २५५ हेक्टरला सिंचन उपलब्ध होणार आहे.

▶▶ पान २ वर

## पारदर्शक, संवेदनशील आणि लोकाभिमुख प्रशासन देणार





■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा अजित पवार यांनी कार्यभार स्वीकारला. त्यांनी आज विधिवतपणे उपमुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्वीकारला. कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची पहिली बैठक घेतली आणि महत्त्वाच्या विषयांचा आढावा घेतला.

या ऐतिहासिक प्रसंगी सुनेत्रा पवार यांनी महाराष्ट्राच्या जनतेप्रती कृतज्ञता व्यक्त करत, सर्वसामान्य नागरिक, महिला, शेतकरी, युवक आणि वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. राज्याच्या प्रगतीसाठी पारदर्शक, संवेदनशील आणि लोकाभिमुख प्रशासन देण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

कार्यभार स्वीकारताना उपस्थित मान्यवर, वरिष्ठ अधिकारी, पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या या नियुक्तीमुळे महिला सक्षमीकरणाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

उपमुख्यमंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर मंत्रालयातील दादांच्या केबिनमध्ये प्रतिमेला अभिवादन केले. त्याचबरोबर त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, माँ जिजाऊ, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीजोती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना अभिवादन केले.

## चंद्रपूर मनपात राजकीय नाट्य
## भाजपच्या संगिता खांडेकर महापौर

### अपक्ष प्रशांत दानव यांची उपमहापौरपदी निवड
### अंतर्गत गटबाजीमुळे काँग्रेस सत्तेपासून दूर



■ **प्रविण बत्की, चंद्रपूर, दि. १० :**
चंद्रपूर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदांच्या निवडीत आज मोठा ट्विस्ट पाहायला मिळाला. सत्ता स्थापनेची पूर्ण संधी असतानाही अंतर्गत वादामुळे काँग्रेसला चंद्रपूर मनपाच्या सत्तेपासून वंचित राहावे लागले असून, येथे उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने यू टर्न घेत भाजपाची साथ दिली. परिणामी, महापौरपद भाजपाच्या पारड्यात गेले.

चंद्रपूर मनपाच्या महापौर व उपमहापौर निवडीसाठी पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली आज सकाळी ११ वाजता मनपा राणी हिराई सभागृहात विशेष सभा पार पडली. या सभेत भाजपाच्या संगीता राजेंद्र खांडेकर यांची महापौरपदी तर अपक्ष उमेदवार प्रशांत आनंदराव दानव यांची उपमहापौरपदी निवड झाली.

महापौर पदासाठी एकूण १० नामनिर्देशन पत्रे दाखल झाली होती. शिवसेना (उबाठा) कडून मनस्वी संदीप गिऱ्हे, काँग्रेसकडून संगीता मंगल भोयर, संगीता गोपालकृष्ण अमृतकर, सुनंदा दिलीप धोबे व वैशाली अजय महाडोळे, तर भाजपकडून संगीता राजेंद्र खांडेकर व सारिका सचिन संदुरकर यांनी अर्ज सादर केले होते.

अर्ज मागे घेण्यासाठीच्या अवधीत मनस्वी गिऱ्हे, संगीता भोयर, संगीता अमृतकर, सुनंदा धोबे व सारिका संदुरकर यांनी अर्ज मागे घेतले. त्यामुळे काँग्रेसच्या वैशाली महाडोळे व भाजप संगीता खांडेकर यांच्यात थेट लढत झाली. हात उंचावून मतदान घेण्यात आले. त्यात वैशाली महाडोळे यांना ३१ तर संगीता खांडेकर यांना ३२ मते मिळाल्याने एका मताच्या फरकाने संगीता खांडेकर यांची महापौरपदी निवड झाली.

उपमहापौर पदासाठी अपक्ष उमेदवार प्रशांत आनंदराव दानव, शेतकरी कामगार पक्षाकडून प्रदीप शंकर देशमुख, काँग्रेसकडून वसंत राजेश्वर देशमुख व राहुल गेंदलाल चौधरी, तसेच भाजपाकडून संजय नारायण कंचर्लावार यांनी अर्ज दाखल केले होते. यापैकी संजय कंचर्लावार, वसंत देशमुख व राहुल चौधरी यांनी ठराविक कालावधीत आपले अर्ज मागे घेतले. त्यामुळे प्रशांत दानव व प्रदीप देशमुख यांच्यात लढत झाली. मतदानात दोघांनाही प्रत्येकी ३२ मते मिळाली. अखेर ईश्वरचिठ्ठी काढण्यात आली. त्यात अपक्ष प्रशांत दानव यांची उपमहापौरपदी निवड झाली.

या मनपात एमआयएमच्या एकमेव सदस्याने केवळ उपमहापौर पदासाठी मतदान केले तर महापौर पदाच्या निवडणुकीत तटस्थ भूमिका घेतली. वंचित बहुजन आघाडीचे दोन सदस्य निवडणूक प्रक्रियेत अनुपस्थित असल्याने ६६ पैकी ६४ सदस्यांनी निवडणुक प्रक्रियेत भाग घेतला.

## परभणीत आम्ही सोयीने वागू?

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर / मुंबई, दि. १० :**
चंद्रपूर मनपात सत्ता स्थापनेच्या घडामोडींवर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली.



चंद्रपूरमध्ये ठाकरे सेनेचा भाजपला पाठिंबा ही घटना महाराष्ट्राच्या राजकारणावर परिणाम करणारी ठरेल, असे ते म्हणाले. ठाकरे सेनेसोबत वंचितचे दोन नगरसेवकही भाजपसोबत जाणार असल्याची प्राथमिक माहिती त्यांनी दिली. अंतर्गत गटबाजीचा फटका काँग्रेसला बसत असल्याचेही त्यांनी मान्य केले.

चंद्रपूरमधील या राजकीय बदलाचा परिणाम आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, राज्यसभा आणि विधानपरिषद निवडणुकांवर होऊ शकतो, अशी चर्चा सुरू आहे. विशेषतः राज्यसभेच्या निवडणुकीत मविआच्या संख्याबळातून जाणाऱ्या खासदाराच्या गणितावर याचा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच उद्धव ठाकरे पुन्हा विधानपरिषदेवर जाणार असल्यास त्यांना मित्रपक्षांच्या पाठिंब्याची गरज भासू शकते.

चंद्रपूर महापौर निवडणुकीत मोठा घोडेबाजार झाल्याचा आरोप सपकाळ यांनी केला. भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांच्या नावाचा उल्लेख करत पैशांच्या जोरावर राजकारण झाल्याचे ते म्हणाले. उबाठा शिवसेनेने काँग्रेसला पाठिंबा न देता भाजपसोबत जाणे हा महाविकास आघाडीसाठी धक्का असल्याचे मत त्यांनी मांडले. वंचित बहुजन आघाडीनेही काँग्रेससोबत राहणे अपेक्षित होते, असे ते म्हणाले.

दरम्यान, चंद्रपूर प्रकरणात निरीक्षकाकडून संपूर्ण प्रकरणाचा अहवाल मागवला असून, ठाकरे गट महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीचा भाग असतानाही त्यांनी वेगळी भूमिका घेतल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. चंद्रपूरमध्ये आम्हाला साथ दिली नाही, तर परभणीत आम्ही आमच्या सोयीने वागायचं का? असा सवाल उपस्थित करीत, महाविकास आघाडी सध्या संक्रमण अवस्थेतून जात असल्याचे ते म्हणाले. या संपूर्ण प्रकरणात काँग्रेस हायकमांडने सपकाळ यांना तातडीने दिल्लीला बोलावल्याची माहिती असून, हातचा घास गमावल्याने काँग्रेस नेत्यांची कानउघाडणी होवू शकते.

## रणवीर सिंगला जीवे मारण्याची धमकी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंग यांना मंगळवारी जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. ही धमकी व्हॉट्सॲपवर पाठवलेल्या एका व्हॉइस नोटद्वारे देण्यात आली आहे, यात आरोपीने कोट्यवधी रुपयांच्या खंडणीची मागणी केली आहे.



सूत्रांनुसार, धमकी मिळाल्यानंतर लगेचच मुंबई पोलिसांनी रणवीर सिंग यांच्या वांद्रे येथील निवासस्थानाबाहेर सुरक्षा वाढवली आहे. अतिरिक्त पोलिस दल तैनात करण्यात आले आहे.

## दादांच्या अपघातामागे १० लाखांचे 'कमिशन' कनेक्शन?

### बड्या विमान कंपनीवर रोहित पवारांचा आरोप : पूर्व विदर्भातील नेत्याकडे अंगुलीनिर्देश

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :**
अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या घटनेला आता धक्कादायक वळण मिळाले आहे. आ. रोहित पवार यांनी या अपघातामागे विमान कंपनीची नफेखोरी आणि नियमांचे उल्लंघन कारणीभूत असल्याचा गौप्यस्फोट केला आहे. केवळ १० लाख रुपयांचे नुकसान वाचवण्यासाठी अजितदादांचा जीव धोक्यात घातला गेला का? असा सवाल उपस्थित करत रोहित पवारांनी व्हिएसआर कंपनीला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे.



आमदार रोहित पवार यांनी हा साधा अपघात नसून एक सुनियोजित 'घातपात' असल्याचा संशय व्यक्त केला आहे. पूर्व विदर्भातील एक वजनदार नेता दादांना भेटण्यासाठी उशिरा आला, ज्यामुळे त्यांचा वेळ दवडला गेला. ट्रॅफिकचे कारण देऊन फाईल येईपर्यंत दादांना थांबवण्यात आले आणि याच दिरंगाईमुळे त्यांना अखेर विमानाने जाण्याचा निर्णय घ्यावा लागला. अजितदादांचे मोबाईल रेकॉर्ड आणि त्या दिवशी त्यांच्या संपर्कात आलेल्या लोकांची चौकशी केल्यास मोठे सत्य समोर येईल, असे रोहित पवार यांनी ठामपणे सांगितले. जोपर्यंत या प्रकरणातील 'मास्टरमाइंड' समोर येत नाही तोपर्यंत आपला लढा सुरूच राहील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना रोहित पवार यांनी कंपनीच्या 'कॉस्ट कटिंग' धोरणावर टीका केली. डीजीसीएच्या नियमांचे उल्लंघन करून वैमानिकांवर कमी वेळात विमाने उडवण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचा दावा त्यांनी केला. एका वैमानिकाला किमान १२ तासांची विश्रांती मिळणे आवश्यक असताना, त्याला अवघ्या ७ तासांत पुन्हा कामावर बोलावले जाते. नकार दिल्यास नोकरीवरून काढण्याची धमकी दिली जाते. अशा तणावाखाली वैमानिक सुरक्षित विमान कसे उडवणार? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे.

रोहित पवारांनी दिलेल्या माहितीनुसार, अजितदादांना बारामतीला सोडल्यानंतर ते विमान शमशाबादमार्गे पाटण्याला जाणार होते. बारामतीत व्हिजिबिलिटी अत्यंत कमी असतानाही विमान उतरवण्याचा अट्टाहास का झाला, याचा उलगडा करताना ते म्हणाले, जर खराब हवामानामुळे हे विमान पुणे किंवा दुसऱ्या विमानतळावर वळवले असते, तर कंपनीचे नियोजित १० लाख रुपयांचे नुकसान झाले असते. हे नुकसान टाळण्यासाठीच कंपनीच्या दबावाखाली वैमानिकाने धोका पत्करून विमान उतरवण्याचा प्रयत्न केला असावा.

या अपघातातील तांत्रिक बिघाडांकडे लक्ष वेधताना रोहित पवार म्हणाले की, विमानात अत्यंत महत्त्वाची असलेली 'स्टॉल वॉर्निंग सिस्टिम' बंद होती. इतकेच नाही तर कॉकपिटमधील संवाद साधणारी यंत्रणाही नीट काम करत नव्हती. विमानाचे बेस मेंटेनन्स कोणाच्या देखरेखीत झाले? यंत्रणा बंद असताना विमान हवेत का झेपावले? असे गंभीर प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत.

## लोकसभा अध्यक्षांविरुद्ध विरोधकांचा अविश्वास प्रस्ताव

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १० :**
लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरुद्ध विरोधकांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. त्यावर ११८ खासदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत. ओम बिर्ला आता लोकसभेत उपस्थित राहणार नाहीत. अविश्वास प्रस्ताव बाद झाल्यानंतरच ते अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारतील.



एजन्सीच्या मते, ९ मार्च रोजी सभागृहात विरोधकांच्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा होऊ शकते. १३ फेब्रुवारी हा चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. त्यानंतर ८ मार्चपासून सभागृहाचे कामकाज पुन्हा सुरू होईल. यापूर्वी, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या १० व्या दिवशी संसद दोनदा तहकूब करण्यात आली होती. संसदेचे कामकाज दुपारी २ वाजल्यापासून सुरू होऊ शकले. शशी थरूर यांनी अर्थसंकल्पावर चर्चा सुरू केली.

दरम्यान, सकाळच्या सत्रात सभागृह वारंवार तहकुब होत असताना केंद्रीय मंत्री किरेन रिजीजू यांनी सदस्यांना हात जोडून विनंती केली की, बजेटवर चर्चा होवू द्या. चर्चा न होणे हे आपल्या सर्वांचे नुकसान करत आहे. तत्पूर्वी, लोकसभेबाहेर बोलताना राहुल गांधी म्हणाले की, माजी लष्करप्रमुख जनरल नरवणे खोटे बोलत आहेत किंवा पेंग्विन खोटे बोलत आहेत. त्यांनी सांगितले की, नरवणे खोटे बोलणार नाहीत असा त्यांना विश्वास आहे.

## राजकीय शत्रू पण सोयरिकीत मित्र?

### पवार-सुळे घराण्यातील शाही विवाहासाठी गडकरी-फडणवीसांचा पुढाकार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर / मुंबई, दि. १० :**
महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर एकमेकांचे कट्टर प्रतिस्पर्धी म्हणून ओळखले जाणारे नेते एका खास कौटुंबिक कारणासाठी एकत्र आले आहेत.



ज्येष्ठ नेते शरद पवार यांची नात आणि खासदार सुप्रिया सुळे यांची सुपुत्री रेवती सुळे लवकरच विवाहबंधनात अडकणार असून, ही सोयरिक जुळवण्यात भाजपचे दिग्गज नेते नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्थाची भूमिका बजावल्याची रंजक माहिती समोर आली आहे.

रेवती सुळे यांचा विवाह 'विश्वराज ग्रुप'चे सर्वेसर्वा अरुण लखानी यांचे चिरंजीव सारंग लखानी यांच्याशी निश्चित झाला आहे. या दोन बड्या घराण्यांना एकत्र आणण्यासाठी भाजपच्या शीर्ष नेत्यांनी पुढाकार घेतल्याचे समजते. माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांची कन्या स्मृती शिंदे यांनी सोशल मीडियाद्वारे या आनंदाच्या बातमीवर शिक्कामोर्तब केले. राजकारणात एकमेकांवर तुटून पडणारे नेते कौटुंबिक स्तरावर किती सलोख्याचे संबंध जपतात, याचे हे उत्तम उदाहरण मानले जात आहे.

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून उच्च विद्याविभूषित असलेल्या रेवती सुळे यांनी गेल्या लोकसभा निवडणुकीत बारामतीमध्ये आपल्या आईसाठी केलेल्या जोरदार प्रचारामुळे त्या चर्चेत आल्या होत्या. तर त्यांचे होणारे पती सारंग लखानी हे केवळ उद्योजक नसून एक उत्कृष्ट बॅडमिंटन खेळाडू म्हणूनही परिचित आहेत.

हा विवाह केवळ दोन व्यक्तींचा नसून दोन भिन्न राजकीय विचारधारांच्या नेत्यांनी एकत्र येऊन जुळवलेला एक अनोखा ऋणानुबंध ठरला आहे. आता सर्वांचे डोळे या भव्य विवाह सोहळ्याच्या तारखेकडे आणि ठिकाणाकडे लागले आहेत.

या विवाहाची अधिकृत घोषणा झाल्यानंतर पवार आणि लखानी कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. नागपूर आणि बारामती यांच्यात या निमित्ताने एक नवा स्नेहसंबंध निर्माण झाला आहे.

## आधी हिंदी लादणाऱ्यांचे कान उपटा
# मग आम्हाला शिकवा!



■ **मुंबई :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी भाषिक वादाबाबत केलेल्या एका विधानामुळे महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक वतुर्ळात मोठे वादंग निर्माण झाले आहे. भाषेच्या आधारावर होणारे वाद हा एक 'स्थानिक आजार' असल्याची टिप्पणी भागवतांनी केली होती. या विधानाचा खरपूस समाचार घेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भागवतांवर जोरदार टीकास्त्र सोडले आहे. "देशभरात हिंदी लादणाऱ्या सरकारचे कान उपटून दाखवा आणि मग आम्हाला शिकवा," अशा परखड शब्दांत राज ठाकरेंनी भागवतांना सुनावले आहे. संघाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त मुंबईत आयोजित दोन दिवसीय व्याख्यानमालेत मोहन भागवत यांनी भाषेबद्दल अति-आग्रही राहणे आणि त्यावरून वाद करणे यावर भाष्य केले. भाषेच्या मुद्द्यावरून होणारे आंदोलन किंवा संघर्ष हा एखाद्या 'स्थानिक आजारा'सारखा आहे, असे सांगताना त्यांनी महाराष्ट्रातील मराठी विरुद्ध अमराठी वादाचा अप्रत्यक्ष उल्लेख केला होता. त्यांच्या या विधानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर मराठी अस्मितेच्या मुद्द्यावरून टीकेची झोड उठली आहे. सरसंघचालकांच्या या भूमिकेवर राज ठाकरे यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर एक लांबलचल पोस्ट लिहून आपला संताप व्यक्त केला आहे.

## सलमान खान भारताचा नागरिक नाही का?
# उपमुख्यमंत्री शिंदे यांचा सवाल



■ **मुंबई :** बॉलिवूड अभिनेता सलमान खान याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमाला लावलेल्या उपस्थितीवरून सुरू असलेल्या चर्चेवर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सडेतोड प्रतिक्रिया दिली आहे. "सलमान खान हा भारताचा नागरिक आहे. त्यामुळे तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमाला गेला, तर त्यात चुकीचे काय आहे?" असा थेट सवाल उपस्थित करत शिंदे यांनी संघाच्या कार्याचे कौतुक केले आहे. २०२५-२६ हे वर्ष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. यानिमित्ताने देशभरात विविध कार्यक्रम, व्याख्यानमाला आणि शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबईत नुकतीच सरसंघचालक मोहन भागवत यांची व्याख्यानमाला पार पडली. मोहन भागवतांच्या या व्याख्यानमालेत अभिनेता सलमान खानसह अनेक बॉलिवूडमधील मंडळींनी हजेरी लावली होती. तर संघाच्या या कार्यक्रमाला सर्व मंडळी प्रेमाखातर नाही, तर नरेंद्र मोदी यांच्या सरकारी भीतीमुळे आली होती, अशी टीका विरोधकांनी केली आहे. यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपली प्रतिक्रिया दिली. प्रसारमाध्यमांशी बोलताना एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाचा आणि त्यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले, "आरएसएस या संस्थेला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. गेली अनेक दशके आपण या संस्थेकडे एक देशभक्त आणि राष्ट्रभक्त संघटना म्हणून पाहत आलो आहोत. कट्टर देशभक्ती आणि राष्ट्रप्रेम काय असते, हे जगाने संघाच्या माध्यमातून अनुभवले आहे."

## नवीन इमारती सर्व सुविधायुक्त असाव्यात



■ **मुंबई :** नागपूर येथील विधानभवन विस्तार प्रकल्प तसेच मुंबई येथील मनोरा आमदार निवास, अजंठा बंगला पुनर्बांधणी आणि मॅजेस्टिक इमारत पुनर्बांधणी कामाचा विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी आज सविस्तर आढावा घेऊन या नवीन इमारती सर्व सुविधायुक्त, दर्जेदार होण्यासाठी सूक्ष्म नियोजन करून त्यानुसार कार्यवाही करावी, अशा सूचना विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिल्या. या इमारतींच्या बांधकाम आढावा बैठकीत नागपूर विधानभवन विस्तारांतर्गत प्रस्तावित नवीन इमारत, मनोरा आमदार निवास, अजंठा बंगला पुनर्बांधणी आणि मॅजेस्टिक इमारत पुनर्बांधणी बांधकामासंदर्भात सविस्तर सादरीकरण करण्यात आले. मनोरा आमदार निवास इमारत मार्च २०२८ तर मॅजेस्टिक इमारत ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले, या इमारतींचे बांधकाम करताना गुणवत्ता, सुरक्षितता व वेळेचे काटेकोर पालन करावे. तसेच प्रकल्पाची वेळेत पूर्तता होण्यासाठी नियमित आढावा बैठक घेण्यात यावी. नागपूर विधानभवन विस्तार प्रकल्पाचा आढावा घेताना सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले, नवी इमारत सर्व सुविधायुक्त असावी. अंतर्गत व्यवस्था दर्जेदार असाव्यात. मनोरा आमदार निवास पुनर्बांधणी प्रकल्पाचा आढावा बैठकीत पुनर्बांधणीच्या कामाची सद्यस्थिती, आतापर्यंत झालेली प्रगती, उर्वरित कामांचे नियोजन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.आमदारांसाठी सुरक्षित, सोयीस्कर आणि आधुनिक निवास सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा असल्याने विहित कालावधीत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे सभापती प्रा. शिंदे यांनी सुचित केले.

## आंतरराष्ट्रीय नेमबाज संभाजी पाटीलचा भीषण अपघातात मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
पुण्याहून गुजरातच्या दिशेने जात असताना मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर पालघर जिल्ह्यातील मनोरजवळ झालेल्या भीषण अपघातात आंतरराष्ट्रीय नेमबाज संभाजी शिवाजी पाटील (वय 27) यांचा जागीच मृत्यू झाला. मनोरजवळील दुर्वेश गावाच्या हद्दीत त्यांची भरधाव फॉर्च्युनर कार एका अवजड वाहनावर पाठीमागून आदळल्याने हा अपघात झाला. ही धडक इतकी भीषण होती की कारचा पुढचा भाग अक्षरशः चेंदामेंदा झाला. या दुर्घटनेत संभाजी पाटील यांनी प्राण गमावले असून, त्यांचा सहकारी यश प्रशांत चौधरी (वय 22) हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

पुण्याहून गुजरातच्या दिशेने जात असताना मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील पालघर येथील दुर्वेश गावाच्या हद्दीत झालेल्या भीषण अपघातात आंतरराष्ट्रीय कीतीर्चे नेमबाज संभाजी पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. सकाळी 10 वाजेच्या सुमारास त्यांचा मित्र प्रणय प्रशांत चौधरी याने आपली भरधाव कार दुसऱ्या मार्गिकेतून पहिल्या मार्गिकेत घेताना समोरच्या 'हायवा' ट्रकचा अंदाज न आल्याने ही जोरदार धडक बसली. या दुर्घटनेत संभाजी पाटील यांनी प्राण गमावले असून, कार चालक प्रणय चौधरी हा गंभीर जखमी झाला आहे.

## शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी
# टास्क फोर्सची स्थापना

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
राज्यातील शेतकरी आत्महत्या ही गंभीर सामाजिक समस्या लक्षात घेऊन कृषी विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी विशेष टास्क फोर्स उभारण्याची घोषणा कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी परिपत्रकाद्वारे केली आहे. या कृती दलाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यासोबतच सामाजिक, आर्थिक आणि हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या संकटांवर एकत्रित उपाययोजना राबविण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. अशा प्रकारचे कृती दल स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

या कृती दलाचे नेतृत्व विस्तार व प्रशिक्षण विभागाचे संचालक रफिक नाईकवाडी करणार आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली सुनील बोरकर, उदय देशमुख, गणेश घोरपडे, जीवन बुंदे, नंदकिशोर नाईनवाड, सत्यजित शितोळे आणि सोनाली शिळकर या अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या दलात केवळ प्रशासकीय अधिकारीच नव्हे, तर शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर काम करणाऱ्या तज्ज्ञांनाही स्थान देण्यात आले आहे.

शिवार फाउंडेशनच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर संशोधन करणारे कृषी समाजशास्त्रज्ञ डॉ. विनायक हेगाणा आणि महिला शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावर अभ्यास करणाऱ्या मानसोपचार तज्ज्ञ सृष्टी डोईजड यांची विशेष सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे या कृती दलाच्या कामात मानवी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोड मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांकडे केवळ कागदी




योजनांपुरते न पाहता प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन उपाययोजना करण्याचा उद्देश आहे.

राज्यात शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी विविध योजना, उपक्रम आणि कार्यक्रम सातत्याने राबवले जात आहेत. तरीही हवामान बदलामुळे वाढणाऱ्या नैसर्गिक आपत्ती, पिकांचे नुकसान, आर्थिक ताणतणाव, सामाजिक दबाव आणि मानसिक अस्थैर्य यामुळे शेतकरी अनेक अडचणींचा सामना करत आहेत. या सर्व घटकांचा विचार करून शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन आणि मानसिक आधार देणे आवश्यक असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

या टास्क फोर्सच्या माध्यमातून आपत्तीपूर्व, आपत्तीच्या काळात आणि आपत्तीनंतर शेतकऱ्यांना शेती, आर्थिक, सामाजिक आणि मानसिक अशा चतुःसूत्री दृष्टिकोनातून मदत केली जाणार आहे. म्हणजेच शेतकऱ्यांच्या अडचणींकडे एकात्मिक पद्धतीने पाहून त्यावर ठोस उपाययोजना केल्या जाणार आहेत. शेतकऱ्यांना नैराश्यातून बाहेर काढणे, त्यांना संकटाचा सामना करण्यासाठी सक्षम बनवणे, हा या कृती दलाचा मुख्य उद्देश आहे. यापूर्वी शिवार संसद आणि शिवार हेल्पलाइन-८९५५७७११११५ या उपक्रमांद्वारे सुमारे अडीच हजार शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यात यश आले आहे. या अनुभवाच्या आधारे आता धोरणात्मक पातळीवर अधिक व्यापक काम करण्याची संधी मिळाली असल्याचे डॉ. विनायक हेगाणा यांनी सांगितले. या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी शाश्वत आणि प्रभावी मॉडेल उभे करता येईल, असा त्यांचा विश्वास आहे.

कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी सांगितले की, शेतकरी आत्महत्या हा विषय केवळ आत्महत्येनंतर नुकसानभरपाई देण्यापुरता मर्यादित नाही. शेतकऱ्याला आधीपासून सक्षम बनवणे, त्याच्या उत्पन्नात वाढ करणे आणि मानसिक स्थैर्य देणे हे अधिक महत्त्वाचे आहे. कृषी विभागातील विविध योजना आणि उपक्रम यांची सांगड इतर विभागांशी घालून अधिक प्रभावी पद्धतीने काम करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## १२ वीच्या परीक्षेसाठी निघालेल्या विद्यार्थ्याचा
# लोकल ट्रेनमधून पडून मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :**
महाराष्ट्रात आजपासून बारावी बोर्डाच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत. मात्र, परीक्षेच्या पहिल्याच दिवशी पेपरसाठी निघालेल्या विद्यार्थ्यावर काळाने घाला घातल्याची घटना घडली आहे. डोंबिवली येथील रहिवासी असलेल्या सोहम कटरे या विद्यार्थ्याचा लोकल ट्रेनमधून पडून अपघाती मृत्यू झाला आहे. ही घटना कळवा-मुंब्रा रेल्वे स्थानकादरम्यान घडली असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डोंबिवली येथील रहिवासी असलेला सोहम कटरे हा विद्यार्थी बारावीच्या पहिल्याच पेपरसाठी घरातून निघाला होता. त्याचे परीक्षा केंद्र कळवा येथील मनिषा विद्यालयात होते. नेहमीप्रमाणेच तो परीक्षेसाठी देखील लोकलनेच निघाला. मात्र सकाळच्या वेळेत लोकलमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होती. या गर्दीमुळे सोहमचा तोल गेला आणि तो चालत्या लोकलमधून खाली पडल्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



या घटनेत सोहमचा जागीच मृत्यू झाल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला आणि पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली. बारावीच्या पहिल्याच पेपरच्या दिवशी दुर्दैवी घटना घडल्याने कटरे कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. तसेच परिसरातील नागरिकांनी देखील हळहळ व्यक्त केली आहे. या घटनेनंतर पुन्हा एकदा लोकल ट्रेन प्रवासाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

मुंबईच्या लोकलमधील वाढती गर्दी, हा गेल्या अनेक वर्षांपासूनचा प्रश्न आहे. गर्दीमुळे अनेकांना जीव गमवावे लागले आहेत. तसेच या लोकलमधून हजारो विद्यार्थी प्रवास करत असतात. शाळेला जाण्यासाठी असो किंवा कॉलेज असो, मुंबईतल्या रस्त्यांवरील गर्दीमुळे परवडणारी लोकल मात्र अनेकांच्या जिवावर बेतत असल्याचे दिसत आहे.

# राज्यभर अवजड वाहनांवर धडक तपासणी मोहीम राबवा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील आडोशी बोगद्याजवळ घडलेल्या भीषण अपघाताच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातील अवजड वाहनांवर व्यापक आणि पारदर्शक तपासणी मोहीम राबवण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

मंत्रालयात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मोटार परिवहन व पोलीस विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांनी निर्देश दिले. अपघात रोखायचे असतील तर नियमांची केवळ अंमलबजावणी नव्हे, तर जागरूकतेची चळवळ उभी राहिली पाहिजे असे ते म्हणाले.

३ फेब्रुवारी रोजी झालेल्या अपघातामुळे कित्येक तास महामार्ग वाहतुकीसाठी विस्कळीत झाला. प्रवाशांचे, विशेषतः महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांचे हाल झाले. प्राथमिक




पाहणीत चालकाच्या बेपर्वाईमुळे, वेगाने ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात वाहनावरील ताबा सुटल्याने अपघात घडल्याचे स्पष्ट झाले आहे. मंत्री सरनाईक म्हणाले, चालकांच्या वाहन चालवण्याच्या पद्धतीवर नियंत्रण आणि प्रबोधन हीच अपघातमुक्त महामार्गाची गुरुकिल्ली आहे.

राज्यातील सर्व अवजड वाहनांची तांत्रिक तपासणी काटेकोर आणि पारदर्शक पद्धतीने करण्याच्या सूचना मंत्री सरनाईक यांनी केल्या. विशेषतः फॉर्म 138/अ अंतर्गत दिल्या जाणाऱ्या वाहन योग्यता प्रमाणपत्र प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यावर भर देण्यात आला. काही प्रादेशिक परिवहन कार्यालयांतून प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणपत्रे दिल्याचे निदर्शनास आल्याने त्याबाबत तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

महामार्गावरील अपघातप्रवण ठिकाणांची (ब्लॅक स्पॉट्स) माहिती चालकांपर्यंत पोहोचवणे, त्या भागात प्रवेश करण्यापूर्वी समुपदेशन व सूचना देणे, तसेच पोलीस व परिवहन विभागाने संयुक्तरीत्या जनजागृती मोहीम राबवणे, या उपाययोजना तातडीने अमलात आणण्याचेही निर्देश मंत्री सरनाईक यांनी यावेळी दिले. महामार्ग अपघात रोखण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांचा सविस्तर अहवाल येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी सादर करण्याचे निर्देशही मंत्री सरनाईक यांनी संबंधित विभागांना दिले.

## खासदार नारायण राणे रुग्णालयात दाखल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
भाजपचे वरिष्ठ नेते व खासदार नारायण राणे यांना मुंबईच्या जसलोक रुग्णालयात



दाखल करण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे. नारायण राणे यांच्यावर हृदयाशी संबंधित उपचार करण्यात येणार असून त्यांना रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर मुंबईतील जसलोक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान, स्थानिक नगरपंचायतीच्या निवडणुकांमध्ये भाजपने मिळवलेल्या यशानंतर नारायण राणे यांचा कणकवली येथे सत्कार समारंभ ठेवण्यात आला होता. त्यावेळी नारायण राणे यांनी केलेल्या भाषणात आता आपण थकलो असल्याचे वक्तव्य केले होते. आता अजून किती करणार याला काही मर्यादा असाव्यात, असे त्यांनी म्हटले होते.

# पहिल्या क्लायमेट वीकचे मुंबईत आयोजन

**बिल गेट्स, सचिन तेंडुलकर, हिलरी क्लिंटन, नोएल टाटा, नादिर गोदरेज, रोहिणी निलेकणी यांची उपस्थिती**

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १० :**
मुंबईत पहिल्यांदाच 17 ते 19 फेब्रुवारी 2026 दरम्यान मुंबई क्लायमेट वीक (एमसीडब्लू) चे आयोजन करण्यात येणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या उपक्रमादरम्यान मुंबई हे ग्लोबल साऊथमधील हवामान नेतृत्वाचे प्रमुख व्यासपीठ ठरणार आहे. या काळात भारत आणि जगभरातील सरकारप्रमुख, उद्योगजगतातील नेते, हवामान क्षेत्रातील नवोन्मेषक, दानशूर संस्था, युवक तसेच स्थानिक समुदायांचे प्रतिनिधी एकत्र येऊन हवामान विषयक चर्चेपासून प्रत्यक्ष कृतीकडे वाटचाल करतील.

मुंबई क्लायमेट वीकचे आयोजन जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे असलेल्या मध्यवर्ती केंद्रामार्फत करण्यात येणार असून, त्याचबरोबर शहरभर विविध शैक्षणिक संस्था, वसाहती आणि सांस्कृतिक ठिकाणी कार्यक्रमांचे जाळे उभारण्यात येणार आहे. या उपक्रमांमधून प्रत्यक्ष अंमलात आणता येतील अशा हवामान उपाययोजनांचे प्रदर्शनही आयोजित करण्यात येणार आहे.

हवामानावरील ही जागतिक पातळीवरील चर्चा पुरस्कारप्राप्त स्वयंसेवी संस्था प्रोजेक्ट मुंबई यांच्या नेतृत्वाखाली होत असून, महाराष्ट्र शासन, पर्यावरण व हवामान बदल विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे या सप्ताहास सहकार्य लाभले आहे. या उपक्रमामुळे मुंबईला भारत तसेच इतर ग्लोबल साऊथमधील शहरांसाठी हवामान उपाययोजनांची लाईव्ह टेस्ट बेड म्हणून स्थान दिले जात आहे.

मुंबई क्लायमेट वीकविषयी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई क्लायमेट वीकद्वारे हवामान बदलावर कृती करण्याचा भारताचा ठाम निर्धार शहर पातळीपासून जागतिक स्तरापर्यंत अधोरेखित होतो. भारत आणि जगभरातील सरकारे, उद्योग, वित्तसंस्था, तज्ज्ञ आणि युवक मुंबईत एकत्र येत असताना, महाराष्ट्र आपल्या नागरिकांसाठी आणि ग्लोबल साऊथमधील देशांसाठी अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि सक्षम भविष्यासाठी सर्व भागीदारांसोबत काम करण्यास तयार आहे, असा स्पष्ट संदेश यातून दिला जात आहे.

प्रोजेक्ट मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संस्थापक शिशिर जोशी म्हणाले, मुंबई ही नेहमीच जिद्द आणि कल्पकतेसाठी ओळखली जाणारी नगरी आहे आणि मुंबई क्लायमेट वीकमध्ये हीच ऊर्जा हवामान संकटाशी मोठ्या प्रमाणावर भिडताना दिसेल. ही भारतातील पहिली अशा स्तरावरील नागरिकांच्या नेतृत्वाखालील हवामान चळवळ आहे, जिथे मंत्री, उद्योगजगतातील नेते आणि तज्ज्ञ हे विद्यार्थी, प्रत्यक्ष काम करणारे कर्मचारी आणि परिसरातील स्वयंसेवक यांच्यासोबत एकाच व्यासपीठावर सहभागी होतील. यामुळे ग्लोबल साऊथमधील हवामान नेतृत्व प्रत्यक्षात कसे असते, हे मुंबई दाखवून देईल.

मुंबई क्लायमेट वीकचे आयोजन हब-अँड-स्पोक मॉडेलद्वारे करण्यात येत आहे. जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे तीन दिवसांचा मुख्य कार्यक्रम होणार असून, त्यात नेतृत्व संवाद, विविध विषयांवरील ट्रॅक्स, एमसीडब्लू इनोव्हेशन चॅलेंज, यूथ ग्रीन इनोव्हेशन चॅलेंज तसेच उपाययोजनांचे प्रदर्शन क्षेत्र असणार आहे.

## टँकर चालकाचा होरपळून मृत्यू

**मुंबई :** मुंबई- नागपूर समृद्धी महामार्गावर कोपरगाव - सिन्नर दरम्यान, नागपूरच्या दिशेने भरधाव वेगाने जाणाऱ्या डिझेल टँकरने पाठीमागून मालमोटारीला जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात टँकर चालकाचा होरपळून मृत्यू झाला. अपघातानंतर महामार्गावर वाहनांच्या लांबवर रांगा लागल्या होत्या.डिझेल टँकर (एमएच ४९ बीझेड ३१८७) हा मुंबईहून नागपूरच्या दिशेने चालला होता. त्याने पुढे चालणाऱ्या मालमोटारीला (एमएच ०४ एफपी २००८) मागून जोराची धडक दिल्याने टँकरने पेट घेतला.

## बीएमएस १२ फेब्रुवारीच्या संपात सहभागी होणार नाही

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १०**
भारतीय मजदूर संघ (बीएमएस) ने १२ फेब्रुवारी रोजी प्रस्तावित सार्वत्रिक संपात सहभागी न होण्याचा निर्णय जाहीर केला आहे. काही केंद्रीय कामगार संघटना आणि संयुक्त किसान मोर्चाने पुकारलेला हा संप राजकीय प्रेरणेतून आयोजित केल्याचे बीएमएसने म्हटले आहे. बीएमएसने चारही श्रम संहितांचे स्वागत केले आहे, परंतु त्यापैकी दोन संहितांमधील काही तरतुदींवर त्यांनी आक्षेप आणि चिंता व्यक्त केली आहे. वेतन संहिता आणि सामाजिक सुरक्षा संहिता ऐतिहासिक व क्रांतिकारी असल्याचे बीएमएसने म्हटले आहे, तर उर्वरित दोन संहितांमधील काही तरतुदींबद्दल संघटनेला चिंता आहे. या सर्व मुद्द्यांवर १३ आणि २१ नोव्हेंबर रोजी भारतीय मजदूर संघ आणि केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडवीय यांच्यात सविस्तर चर्चा झाली. या चर्चेनंतर, श्रममंत्र्यांनी बीएमएसने मांडलेल्या आक्षेपांवर योग्य तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

पान १ वरून....

### ई मेल नोटीसला...

मंत्रिमंडळ बैठकीत इतर अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले. नाबार्डकडून जलसंपदा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पंधरा हजार कोटींचे दीर्घ मुदतीचे कर्ज. यातून ५७ अपूर्ण सिंचन प्रकल्प व १९३ पूर्ण प्रकल्पांच्या वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्यात येणार. राज्यातील ८ लाख हेक्टर कृषि क्षेत्राला सिंचन सुविधा निर्माण होण्याने राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे . कोल्हापूर जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम होणार असून, मौजे विकासवाडी येथे १२ हेक्टर ७६ आर शासकीय जमीन उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात आली .

पुणे जिल्ह्यातील पुरंदर विमानतळासाठी विशेष हेतू प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणार असून, प्रकल्पाला गती देण्यासाठी, भुसंपादन व अनुषांगिक बाबींसाठी सहा हजार कोटींचे कर्ज दिले जाईल . एमआयडीसी, एमएडीसी आणि सिडको यांची सहभागीदारी, त्यांच्याकडे भागीदारीनुसार कर्ज फेडीची जबाबदारी असेल . या कर्जाला शासन मान्यता व हमी देण्यास मान्यता देण्यात आली . राज्यात माझं गाव, आरोग्य संपन्न गाव अभियान राबविणार असून, गावपातळीवर आरोग्य सुधारणा घडवून आणण्यावर भर दिला जाईल. ग्रामपंचायतीला राज्यस्तरीय पुरस्कारासाठी पाच ते २ कोटी रुपयांचा पुरस्कार दिला जाईल . आहारात बदल करण्यासाठी प्रोत्साहन, प्रतिबंधात्मक उपाययोजना, वेळेवर उपचार व पुनर्वसन हे अभियानाचे चार स्तंभ. राज्यस्तरापासून उपकेंद्र-ग्रामस्तरापर्यंतचे नियोजन. आर्थिक वर्ष १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ पर्यंत अभियान कालावधी. अभियानाकरिता दरवर्षी ८० कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद करण्यात मान्यता देण्यात आली राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील बक्षिसांच्या रकमेत वाढ करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला . विद्यार्थी, शिक्षक, प्रयोगशाळा परिचर यांना वाढीव बक्षीस मिळणार आहे . महाराष्ट्र सार्वजनिक - खासगी भागीदारी (पीपीपी) धोरण २०२६ जाहीर करण्यात आले. वित्तीय मुल्य २५ कोटीहून अधिक असेल, अशा सार्वजनिक - खासगी भागीदारी प्रकल्पांना मंजूरी देण्याचे अधिकार मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीला देण्यात आले . नियोजन विभागात यासाठी स्वतंत्र कार्यासन निर्मितीस मान्यता देण्यात आली . परभणी जिल्ह्यातील इंद्राणी सहकारी सूतगिरणीला शासन अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला .सुधारित धान्य वितरण प्रणालीत अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक करण्यासाठी वाहतूक कंत्राटे निश्चितीसाठी एकाच वेळी निविदा प्रक्रीया राबविण्यास मान्यता देण्यात आली.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचे जागतिक वारसा प्रमाणपत्र स्वीकारण्याकरिता ॲड. आशिष शेलार फ्रान्सला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :**
हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या 12 किल्ल्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान दिले आहे. त्यासंदभार्तील युनेस्कोचे अधिकृत प्रमाणपत्र स्वीकारण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार हे आज रात्री शिष्टमंडळासह फ्रान्स दौऱ्यावर जाणार आहेत.

11 फेब्रुवारी ते 16 फेब्रुवारी 2026 दरम्यान ते पॅरिस येथे होणाऱ्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमांमध्ये सहभागी होतील. युनेस्को मुख्यालयामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे उभारण्यात आलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याला एका विशेष कार्यक्रमात ते अभिवादन करणार आहेत.

सुमारे दीड वर्षांच्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतर गतवर्षी 11 जुलै 2025 रोजी, युनेस्कोच्या 47व्या अधिवेशनात, मराठा मिलिटरी लँडस्केप्स ऑफ इंडिया या नावाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील 12 किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत स्थान देण्यात आले. या मानांकनाचे अधिकृत प्रमाणपत्र मंत्री ॲड.शेलार यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ पॅरिस येथे स्वीकारणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमणाशी लढून उभारलेल्या हिंदवी स्वराज्याचे रक्षण, सुरक्षित शासनव्यवस्था आणि लोककल्याण, यासाठी साकारलेली गड-किल्ल्यांची साखळी हा भारतीय



इतिहासातील अद्वितीय लष्करी व राज्यकारभाराचा नमुना मानला जातो. रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, खांदेरी आणि तामिळनाडूमधील जिंजी असा 12 किल्ल्यांचा समूह जागतिक वारसा स्थळ म्हणून संपूर्ण जगासमोर उभा राहिला आहे. या फेब्रुवारी 2025 मध्ये ॲड.शेलार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाचे चार सदस्यीय प्रतिनिधीमंडळ पॅरिसमध्ये युनेस्कोसमोर तांत्रिक आणि धोरणात्मक मांडणी करून या मानांकनासाठी सादरीकरण आणि युक्तीवाद करून आले होते. आता प्रत्यक्ष मानांकन-पत्र स्वीकारण्याच्या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्याच्या या दौऱ्याला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा आणि मराठा साम्राज्याच्या वारशाचा जागतिक सन्मान असा गौरवशाली आयाम लाभत आहे.

या दौऱ्यात मंत्री ॲड. शेलार हे युनेस्कोचे महासंचालक, संबंधित तज्ज्ञ व भारताचे युनेस्कोमधील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांच्यासमवेत स्वतंत्र बैठकींमध्ये सहभागी होऊन महाराष्ट्रातील इतर प्रस्तावित वारसास्थळांबाबत सविस्तर चर्चा करणार आहेत. कोकणातील कातळशिल्पे, महाराष्ट्रातील सागरी किल्ले तसेच अमूर्त सांस्कृतिक वारशांतर्गत पंढरपूर वारी, गणेशोत्सव व दहीहंडी यांना जागतिक वारसा म्हणून मान्यता मिळविण्यासाठी राज्य शासनाने सुरू केलेल्या प्रयत्नांना या भेटीत नवे बळ मिळेल, असा विश्वास मंत्री ॲड.शेलार यांनी व्यक्त केला आहे. यासोबतच वांद्रे, मुंबई येथे उभारण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या महाराष्ट्र वस्तुसंग्रहालयासाठी पॅरिसमधील नामांकित संग्रहालये, त्यांचे व्यवस्थापन, प्रदर्शनरचना, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी बाबींचा अभ्यास करून त्या धर्तीवर येथील संग्रहालय अधिक समृद्ध करण्यासाठी हे शिष्टमंडळ या दौऱ्यात पाहणी व अभ्यास करणार आहे.

# एमआयडीसी क्षेत्रातील कामे पूर्णत्वास जाण्यासाठी कार्यक्षम पाठपुरावा करा : जिल्हाधिकारी वर्षा मीना

▪अकोला,दि..१० (प्रतिनिधी)▪

औद्योगिक वसाहतीत स्वतंत्र वीज उपकेंद्र, १०० फुटी जोडणी रस्ता, स्वतंत्र जलवाहिनी पूर्णत्वास जाण्यासाठी अधिक कार्यक्षमतेने पाठपुरावा करावा. त्याचप्रमाणे, कामे अपूर्ण ठेवणा-या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी येथे दिले.जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत झाली त्यावेळी त्या बोलत होत्या. महापालिका आयुक्त सुनील लहाने, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सचे निकेश गुप्ता, अकोला औद्योगिक संघटनेचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, लघुउद्योग भारतीचे पंकज बियाणी, आशिष चंदराणा, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी राजेंद्र जाधव, केदार पवार, महावितरणच्या अधिक्षक अभियंता प्रतीक्षा शंभरकर, साबांवि कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील आदी उपस्थित होते.



महान प्रकल्प ते एमआयडीसी जलवाहिनीचे काम लवकर पूर्ण व्हावे. काम अपूर्ण ठेवले जात असेल तर कंत्राटदारावर कारवाई व्हावी. शासनाकडे दिलेल्या प्रस्तावांचा सक्षम पाठपुरावा करावा. सीएफसी सेंटर व उद्योगभवनासाठी विद्युतीकरण आदी आवश्यक मान्यता तत्काळ मिळवून काम पूर्ण करावे. उद्योजक बांधवांच्या अडचणी दूर करून जिल्ह्यात उद्योगवृद्धीसाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी यावेळी दिले. औद्योगिक परिसरातील अनेक पथदिवे बंद आहेत. त्याची पाहणी करून सर्व पथदिवे सुरू होण्यासाठी प्रयत्न करावेत. त्याशिवाय कंत्राटदाराचे देयक अदा करू नये, असेही निर्देश देण्यात आले. नगरविकास विभागाच्या बिल्डींग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टीमची माहिती नगररचना सहायक संचालक सादिक अली यांनी दिली. नकाशा मंजुरीची प्रक्रिया सुलभीकरण करण्यासाठी अधिक प्रयत्न होत आहेत, असेही त्यांनी सांगितले. उद्योग केंद्राचे अधिक्षक भगवंत अनवाणे यांनी आभार मानले.

# श्रीरामदास नवमीनिमित्त २५ हजार विद्यार्थ्यांचा '५१ मनाचे श्लोक' सामूहिक पठन सोहळा

▪अकोला,दि..१० (प्रतिनिधी)▪

अँड. धनश्री देव स्मृती सेवा व निलेश देव मित्र मंडळ यांच्या संयुक्त संकल्पनेतून श्रीरामदास नवमीनिमित्त बुधवार, ११ फेब्रुवारी २०२६ रोजी 'समर्थ रामदास स्वामींचे ५१ मनाचे श्लोक' या सामूहिक पठनाचा भव्य आणि ऐतिहासिक उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. 'जागर भक्तिचा' या उपक्रमांतर्गत अकोला शहरातील २० शैक्षणिक संस्थांमधील सुमारे २५,००० विद्यार्थी एकाच वेळी श्लोक पठण करणार आहेत.यंदा श्रीरामदास नवमीला ३४४ वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर हिंदू संस्कृतीचा जागर व्हावा, समर्थ रामदास स्वामींच्या विचारांचे व शिकवणीचे संस्कार आजच्या पिढीवर व्हावेत, तसेच विद्यार्थ्यांमध्ये भक्ती, शिस्त व नैतिक मूल्यांची जोपासना व्हावी, या उद्देशाने हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. सकाळच्या नियमित प्रार्थना वेळेत प्रत्येक सहभागी शाळेच्या आवारात विद्यार्थी एकत्र येऊन समूहशः '५१ मनाचे श्लोक' पठन करणार आहेत.या उपक्रमात अकोला शहरातील अनेक नामांकित शाळा व महाविद्यालयांचा सहभाग लाभणार आहे. त्यामध्ये खंडेलवाल इंग्लिश प्रायमरी स्कूल, मोहरिदेवी खंडेलवाल हायस्कूल, शंकरलाल खंडेलवाल म हाविद्यालय, भिकमचंद खंडेलवाल हायस्कूल (गोडबोले प्लॉट), माँ. रेणुका मराठी प्राथमिक शाळा, ज्ञानदर्पण इंग्लिश शाळा, अमृत कलश विद्यालय, भारत विद्यालय (प्राथमिक व माध्यमिक), विवेकानंद इंग्लिश हायस्कूल, बाल शिवाजी प्राथमिक व माध्यमिक शाळा, खंडेलवाल ज्ञान मंदिर (गौरक्षण), महाराष्ट्र माध्यमिक शाळा अकोला, डॉ. हेडगेवार प्राथमिक व माध्यमिक शाळा, विद्याभारती अकोला, डी. वाय. पाटील माध्यमिक शाळा, संताजी इंग्रजी प्राथमिक शाळा आदी शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे.या सामूहिक श्लोक पठणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समर्थ रामदास स्वामींच्या विचारांची ओळख होणार असून, जीवनात आत्मशिस्त, कर्तव्यभावना व समाजभान विकसित होण्यास मदत होईल. अशा प्रकारच्या संस्कारक्षम उपक्रमां मुळे सुसंस्कृत आणि जबाबदार पिढी घडविण्यास हातभार लागेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.या ऐतिहासिक व आध्यात्मिक उपक्रमाला सर्व शैक्षणिक संस्था, विद्यार्थी, पालक व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन नगरसेवक निलेश देव, अँड. धनश्री देव स्मृती सेवा व निलेश देव मित्र मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# व्यावसायिकदृष्टया फायदेशीर नैसर्गिक शेती तंत्रज्ञान वापरासह प्रचार प्रसारात महाराष्ट्र देशपातळीवर अग्रेसर राज्य ठरावे- कृषि मंत्री ना. दत्तात्रय भरणे

अकोला : कृषिप्रधान संस्कृती लाभलेल्या आपल्या देशाने कृषि वैज्ञानिक आणि शेतकऱ्यांच्या योगदानातून कधीकाळी इतर प्रगत राष्ट्रावरील अन्नधान्य उत्पादनातील परावलंबीत्व झूगारत केवळ आपल्या सर्वधिक लोकसंख्यांक देशाची भूकच भागविली नाही.

तर अन्नधान्य, फळे व इतर कृषि उत्पादांच्या निर्यातीत महत्वपूर्ण भूमिका बजावत आपले सर्वोत्तम योगदान दिले असल्याचे प्रतिपादित करतांना महाराष्ट्र राज्याचे कृषि मंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी राज्यातील शेती क्षेत्राचे आधीपत्य



अधोरेखित केले व सध्या काळाची गरज बनलेल्या व्यावसायिकदृष्ट्या फायदेशीर नैसर्गिक शेतीच्या तंत्रज्ञान वापरासह प्रचार प्रसारात महाराष्ट्र देशपातळीवर अग्रेसर राज्य ठरेल असा आत्मविश्वास देखील व्यक्त केला. नैसर्गिक शेतीचे विविध पैलू जाणून घेण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाच्या नैसर्गिक शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे वतीने 'नैसर्गिक शेती - संधी आणि आव्हाने' या अतिशय महत्त्वकांक्षी विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय विचार मंथन सत्राचे आयोजन कृषि महाविद्यालय अकोलाच्या स्व. के. आर. ठाकरे सभागृहात करण्यात आले होते, यां अतिशय महत्वाकांक्षी ब्रेन स्टोर्मिंग सत्राच्या उदघाटन प्रसंगी कार्यक्रमाचे उदघाटक तथा अध्यक्ष म्हणून राज्यभरातून उपस्थित होते.

# कासोदच्या वीरभद्र तिर्थक्षेत्री महाशिवरात्री यात्रा

▪अकोला,दि..१० (प्रतिनिधी)▪

अकोट तालुक्यातील श्री वीरभद्र तिर्थक्षेत्र, कासोद,अमोना येथे महाशिवरात्रीच्या पर्वावर दि १५ फेब्रुवारी रोजी ३९ व्या यात्रा म होत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.यात सकाळी ८ वाजता श्री वीरभद्र स्वामी पूजन व रुद्राभिषेक होणार आहे.सकाळी ११ वा भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ५ वा प्रा. डॉ. सचितानंद बिचेवार यांचे 'समाजउन्नती साठी महात्मा बसवेश्वर यांच्या विचारांची गरज' या विषयावर व्याख्यान होणार आहे.संध्याकाळी ६ वा संस्थानच्या वतीने आमंत्रित मान्यवरांचा सत्कार सोहळा आयोजित केला आहे. या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रा. विश्वनाथ हजारे,मा.अध्यक्ष महाराष्ट्र वीरशैव सभा, पुणे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून आ अमोलदादा मिटकरी, आ.प्रकाशभाऊ भारसाकळे,आ.हरीषआप्पा पिंपळे, निखिल पाटील,उपविभागीय पोलीस अधिकारी अकोट,जि प चे माजी अध्यक्ष बालमुकुंद



भिरड जगनराव निचळ मा जि.प. सदस्य, प्रकाशभाऊ आतकड मा जि.प. सदस्य, प्रा. डॉ. संतोष हुशे, अँड. संतोष राहाटे, सौ. नैनाताई इंगोले,महिला व बालकल्याण समिती सभापती, न प अकोट, शंकरराव लंगोटे,एस. बी. अग्रवाल,किशोर जुनघरे, ठाणेदार, अकोट ग्रामीण, प्रवीण किसनदादा हुंडीवाले,समाजसेवक, बाळासाहेब बोंद्रे,मा. जि.प. सदस्य,सुभाषभाऊ लटकुटे मा. जि.प. सदस्य, भास्करराव महाले, वासुदेवराव कोळसकर आदी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात रात्री ८ वा सत्यपाल महाराजांचे शिष्य डॉ. रामपाल धारकर महाराज यांचा समाज प्रबोधन व व्यसनमुक्ती कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर रात्री १० वाजता श. ब्र. १०८ गुरु शिवशंकर शिवाचार्य महाराज मठ संस्थान नेरपिंगळाई धर्मगुरूचे प्रवचन व आशिर्वचन होणार आहे.दि १६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता श्री वीरभद्र वीरफळी महोत्सव साजरा करण्यात येईल. सकाळी ११ वाजता कुलाचाराप्रमाणे वीरभद्र स्वामीला नैवेद्य अर्पण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात येईल. यात्रे दरम्यान दरवर्षीप्रमाणे संस्थानवर पोलिसांचा बंदोबस्त राहणार आहे. या यात्रा महोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री वीरभद्र तिर्थक्षेत्राचे अध्यक्ष अँड. हेमंत सपाटे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## श्रीमती पुष्पाताई मानकर यांचे दुःखद निधन



**अकोला** :'गायत्री परिवाराच्या वरिष्ठ साधिका तथा ज्येष्ठ प्रचारक श्रीमती पुष्पाताई देवलाल मानकर यांचे अल्पशा आजाराने मंगळवार दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८१ वर्षाचे होते. त्यांचे मागे अँड किशोर मानकर डॉ. धनंजय मानकर हे २ मुलं व जिल्हा ग्राहक मंचाचे अध्यक्ष अँड वैशाली राजेश्वर गावंडे ह्या १ मुलगी व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा मंगळवार दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २ वाजता त्यांचे राहते गोकुळ कॉलनी जवाहर नगर अकोला येथून निघून उमरी येथील वैकुंठधाम स्मशान भूमीत त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. गायत्री परिवाराचा प्रचार साधना होम हवन धार्मिक कार्यक्रम सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या पुष्पाताई मानकर मावशी अकोला शहर जवळपासचे शहर व पंचक्रोशीत प्रख्यात होत्या. त्यांच्या निधनाबद्दल माजी मंत्री डॉ. रणजीत पाटील यांचेसह अनेकांनी शोक संवेदना व्यक्त केली आहे.

# जल्लोषात होणार शनिवार पासून सार्वजनिक शिवजयंती कार्यक्रमास प्रारंभ

## यंदा 'स्वराज्याचा रक्षक-शिव छावा नाटिका'

▪अकोला,दि..१० (प्रतिनिधी)▪

महानगरातील सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने दिनांक १४ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी पर्यंत शिवजयंती निमित्त शिव सप्ताह विविध कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आला आहे. यंदा या शिवजयंती सोहळ्याचे मुख्य आकर्षण 'स्वराज्याचा रक्षक-शिव छावा नाटिका' राहणार असून विविध कार्यक्रमाच्या अनुषंगाने ही शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक शिवजयंती उत्सव समि तीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत समितीचे पवन महल्ले यांनी दिली.यावेळी संजय गोटफफोडे , निरंजन पावसाळे , राम बोंद्रे,अँड देवशिष काकड, संदीप बाथो आदी उपस्थित होते.शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी पार्क येथील शिवप्रतिमेचे पूजन करून या शिव जयंती सप्ताहास प्रारंभ होणार आहे.रविवार दिनांक १५ रोजी सकाळी १० वाजता शिवाजी पार्क येथे विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा होणार आहे.तसेच सकाळी ११ वाजता




याच ठिकाणी किल्ले बांधणी स्पर्धा होणार आहे.तर दुपारी १२ वाजता शिवकालीन शस्त्र प्रदर्शनीचा मान्यवरांच्या हस्ते प्रारंभ होणार आहे.सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी प्रत्येक शाळेत शालेय स्तरावर निबंध स्पर्धा घेण्यात येणार आहे.शिव छत्रपती च्या जिवनावर आधारित या शालेय निबंध स्पर्धे त सर्व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

मंगळवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता टिळक पार्क परिसरात समितीच्या वतीने भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता शिवाजी पार्क परिसरात भव्य रांगोळी स्पर्धा होणार आहे.तर सायंकाळी ६ वाजता सिटी कोतवाली येथील महाराणा प्रताप बागेपासून ते शिवाजी पार्क पर्यंत भव्य मशाल रॅली आयोजित करण्यात आली आहे.गुरुवार दिनांक १९ फेब्रुवारी या शिवजयंती दिनी शिवाजी पार्क येथे सकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा जल्लोषात साजरा करण्यात येणार आहे. या नंतर शिवजयंती घरोघरी हे स्पर्धात्मक अभियान राबविण्यात येणार आहे. दु १ वाजता शिवाजी पार्क येथे अन्नदान सेवा उपक्रम होऊन दु ३ वाजता डॉ आंबेडकर खुले नाट्य गृह येथून शिवाजी महाराज पार्क पर्यंत भव्य महारैली आयोजित करण्यात आली आहे. ही महारैलीचे येथे आगमन झाल्यावर सायंकाळी ७ वाजता शिवाजी महाराज पार्क येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या वर आधारित 'स्वराज्याचा रक्षक-शिव छावा नाटिका' सादर करण्यात येणार आहे.

या उत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री आकाश फुंडकर, आ. रणधीर भाऊ सावरकर,खा अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल माजी महापौर विजय अग्रवाल भाजप जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर महानगराध्यक्ष जयंत मसने महापौर शारदाताई खेडकर उपमहापौर अमोल गोगे आदी उपस्थित राहणार असून शिवप्रेमी महिला, पुरुष ,युवक युवतीनी या शिवजयंती सप्ताहातील उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन शिवजयंती महोत्सव साजरा करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.या पत्रकार परिषदेत यावेळी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे राहुल लोहिया, सागर तिवारी, ऋषी जगताप,गणेश माने,ललित भंगाळे, गजु पाटील,अविनाश कानगुडे,हरीश जंगम, सनी मानकर,वैभव मोरे,अक्षय थोरात,शुभम गोतमारे, बाबू ठाकूर,पंकज मुराई, दुर्गेश पाटील,सूरज जगताप, प्रतीक खराटे,साहिल सप्रे, रोशन कसाब समवेत अनेक सेवाधारी व शिवप्रेमी उपस्थित होते.

## थोडक्यात

### जिल्ह्यात १८ वाळूघाटांच्या ई-लिलावाला मुदतवाढ

**अकोला** : जिल्ह्यातील ८ वाळूघाटांच्या ई-लिलावाला दहावी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यात अकोला तालुक्यातील कपिलेश्वर, एकलारा, म्हैसांग, उगवा, तसेच बाळापूर तालुक्यातील बहादुरा, सागद, नागद व मांजरी येथील वाळूघाट आहेत.ई-लिलाव वेळापत्रकामध्ये बदल करण्यात आला असून त्याबाबतचे शुध्दीपत्रक htts://mahatenders.gov.in व htt{s://www.akola.gov.in या संकेतस्थळावर दि. ९ फेब्रुवारी रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, जिल्ह्यातील १० वाळूघाटांच्या लिलावाला आठवी मुदतवाढ देण्यात आली आहे. मूर्तिजापूर तालुक्यातील कोळसरा-१, खापरवाडा-२ (खैरी), लोणसणा, बपोरी, पिंगळा दापुरा, बाळापूर तालुक्यातील काजीखेड-२, हिंगणा शिकारी, मोखा, स्वरूपखेड, जानोरीमेळ, तसेच तेल्हारा तालुक्यातील वांगरगाव या ठिकाणांचा समावेश आहे. या ई-लिलाव प्रक्रियेत दि. १७ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वा. पर्यंत ई-निविदा (ई-टेंडर) ऑनलाईन स्वीकारण्यात येतील. दि. १८ फेब्रुवारीस तांत्रिक लिफाफा उघडण्यात येईल. ई-निविदा तांत्रिक पडताळणीनंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता ते दुपारी १ वाजेपर्यंत ई-ऑक्शन (ई-लिलाव) प्रक्रिया होईल, अशी माहिती जिल्हा खनिकर्म अधिकारी विशाल धांडे यांनी दिली. या लिलावामध्ये जास्तीत जास्त इच्छुक लिलावधारकांनी सहभाग नोंदवावा, असे जिल्हा प्रशासनामार्फत आवाहन करण्यात आले आहे.

### सालासार बालाजी मंदिरात यंदा बाबा अमरनाथ दर्शन झाकी भव्य महाशिवरात्री उत्सवाचे आयोजन

अकोला-गंगानगर परिसरातील पवित्र सालासर बालाजी



मंदिरात महाशिवरात्री उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री सालासर बालाजी सेवा समितीच्या वतीने महाशिवरात्री दि १५ फेब्रुवारी रोजी आयोजित या उत्सवात यंदो बाबा अमरनाथची शिवलिंग दर्शन झांकी साकार केली जाईल. उत्सवात दुपारी ४ वाजता पुरोहित हरीश गोगरकर व सहयोगी पुरोहितांकडून अखंड लघुरुद्रपाठ होईल. या वेळी देशभरातील विविध नद्यांच्या पाण्याने १००८ जलधाराचा अखंड सहस्रधारा जलाभिषेक शिवलिंगावर केला जाईल. मंदिर परिसरात अखंड 'ओम नमः शिवाय' चा जाप आयोजित केला गेला आहे. उत्सवात शिवलिंगाचा भव्य श्रृंगार करून सायंकाळी ७ वाजता सामूहिक महाआरती होईल. या भव्य महाशिवरात्री निमित्त मंदिरात रंगीत विद्युत रोषणाई व फुलांची सजावट केली जाईल. मुलांच्या मनोरंजनासाठी परिसरात विशेष झोन उपलब्ध करून देण्यात आले आहे. शिवभक्तांनी या बाबा अमरनाथ दर्शन झांकी व सहस्रधारा जलाभिषेक उत्सवाचा मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन सालासर बालाजी सेवा समितीच्या सर्व सेवादारांनी केले

### मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धेमध्ये 'गर्दीतलं एकटं राहणं' ललित लेख ठरला प्रथम भावगंध वाचक संघाने मारली बाजी

अकोला : अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मलकापूर-अकोला शाखा, प्रभात कीड्स स्कूल, अकोला आणि रंगगंध कलासक्त न्यास, चाळीसगाव यांचे सयुक्त विद्यमाने आयोजित मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धेची प्राथमिक फेरी हि दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी अकोला येथे उत्साहात पार पडली.

प्रभात किड्स स्कूलच्या भावगंध वाचक संघाच्या 'गर्दीतलं एकटं राहणं' या प्रा. चंद्रकांत पोरे लिखित व दिग्दर्शित ललित लेखाने प्रथम क्रमांक मिळवून दि. २८ फेब्रुवारी रोजी चाळीसगाव येथे होणाऱ्या अंतिम फेरीत त्यांची निवड करण्यात आली. या संघात प्रभात किड्स स्कूलचे शिक्षक सौ. स्वाती ठाकरे, सौ. वर्षा दांडगे, सौ. कविता विखे, अविनाश तराळे यांचा सहभाग होता. या स्पर्धेत उत्कृष्ट अभिवाचनासाठी सौ. स्वाती ठाकरे, सौ. सारिका अयाचित, प्रा. निनाद कुलकर्णी, विष्णू निंबाळकर, आनंद जागीरदार आणि अर्चना मुळे यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. या अभिवाचन स्पर्धेत अकोल्यातून एकूण ६ संघांनी आपला सहभाग नोंदविला. कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून प्रभात किड्स स्कूलचे संचालक डॉ. गजानन नारे तर प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ रंगकर्मी आणि नाट्य दिग्दर्शक अरुण घाटोळे, प्रा. मधू जाधव, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, अकोला शाखा मलकापूरचे अशोक ढेरे हे लाभले होते. तर या स्पर्धेला परीक्षक म्हणून मंगेश बक्षी, अमरावती हे मंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक ढेरे यांनी केले. तर सूत्रसंचालन व आभार प्रभातचे सांस्कृतिक विभाग प्रमुख नंदकिशोर डंबाळे यांनी केले. या अभिवाचन स्पर्धेला अकोल्यातील ज्येष्ठ रंगकर्मी तसेच नाट्य प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

SIMPLEX MILLS CO. LTD.

## सिम्प्लेक्स मिल्स कंपनी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: गाव शिवणी, तालुकंड जिल्हा-अकोला-४४४ १०४
कॉर्पोरेट कार्यालय: ३०, केशवराव खाड्या मार्ग, संत गाडगे महाराज चौक, महालक्ष्मी (पूर्व), मुंबई-४०००११
Tel No:+91 22 2308 2951 Website : www.simplex-group.com
E-mail : mills@simplex-group.com CIN-L65900MH1998PLC116585

**३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांच्या स्वतंत्र अनधिकृत आर्थिक निकालांचा सारांश**

(प्रति शेअर डेटा वगळता लाखांमध्ये)

| अ. क्र | विशिष्ट | ३१.१२.२०२५ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षण न केलेली) | ३१.१२.२०२५ रोजी संपलेली नऊ महिने (अलेखापरीक्षण न केलेली) | ३१.१२.२०२४ रोजी संपलेली तिमाही (अलेखापरीक्षण न केलेली) |
|---|---|---|---|---|
| 1 | ऑपरेशन्समधून एकूण उत्पन्न | 6.35 | 12.65 | 8.98 |
| 2 | (कर आणि अपवादात्मक वस्तूंपूर्वीच्या कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) | (1.81) | (5.91) | 0.68 |
| 3 | करपूर्व कालावधीसाठी (अपवादात्मक वस्तूंपूर्वी) निव्वळ नफा/(तोटा) | (1.81) | (5.91) | 0.68 |
| 4 | करपूर्व कालावधीसाठी (अपवादात्मक वस्तूंनंतर) निव्वळ नफा/(तोटा) | (1.81) | (5.91) | 0.68 |
| 5 | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न (ज्यात (करानंतर) कालावधीसाठी नफा/(तोटा) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर) समाविष्ट आहे | (1.81) | (5.91) | 0.68 |
| 6 | इक्विटी शेअर भांडवल | 300.04 | 300.04 | 300.04 |
| 7 | प्रति शेअर उत्पन्न (१,०००/-प्रत्येकी) (चालू आणि बंद केलेल्या कामकाजासाठी)- (वार्षिकीकृत नाही) मूलभूत आणि सौम्य | (6.04) | (19.69) | 2.27 |

टिपा:
१ वरील माहिती सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजकडे दाखल केलेल्या तिमाही आर्थिक निकालांच्या तपशीलवार स्वरूपाचा उतारा आहे. त्रैमासिक स्वतंत्र आर्थिक निकालांचे संपूर्ण स्वरूप स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइट www.bseindia.com आणि कंपनीच्या वेबसाइट www.bseindia.com वर उपलब्ध आहे.
२ वरील निकालांचे पुनरावलोकन लेखापरीक्षण समितीने केले आहे आणि १० फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत त्यांना मान्यता दिली आहे.
३ वरील आर्थिक निकाल कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत आणि लागू असलेल्या मर्यादेपर्यंत इतर मान्यताप्राप्त लेखा पद्धती आणि धोरणांनुसार तयार केले आहेत.
४ ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांच्या लेखापरीक्षण न झालेल्या वित्तीय बाबींचे तपशीलवार स्वरूप खाली दिलेला QR कोड स्कॅन करून पाहता येईल.

ठिकाण: मुंबई
दिनांक: १० फेब्रुवारी, २०२६

सिम्प्लेक्स मिल्स कंपनी लिमिटेडसाठी
स्वा/-
शेखर आर. सिंग
अध्यक्ष
डीआयएन: ०३३५७८२१

RNINO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale. Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak Local Editor - Purushottam Madhukarrao Dhole. Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023

आर.एन.आय. नोंदणी क्र. ४६९७३/१९८८ महासागर अकोला मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, खामला स्केअर दुर्गा चौक, अकोला येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक, स्थानिक संपादक : पुरूषोत्तम मधुकरराव ढोले. फोन: ९८८१४८९४७९ (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील)

# दीनदयाळ उपाध्याय : गरिबांचे कैवारी

११ फेब्रुवारी ही पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची पुण्यतिथी. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन!

-------------

२५ सप्टेंबर, १९१६ रोजी 'दीना' या नावाने नंतर लहानपणी घरात ओळखल्या जाणाऱ्या बालकाचा जन्म झाला. आई रामप्यारी आणि वडील भगवती प्रसाद यांचे कुटुंब आर्थिक दृष्ट्या अगदीच सामान्य, किंवा खरंतर गरीबच होते.

परिस्थितीचे लागोपाठ आघात दीनदयाळवर झाले. तीन वर्षाचे असताना त्यांच्या वडीलांचे निधन झाले. या धक्क्यामुळे आईची तब्येत ही बिघडत गेली. क्षयरोगामुळे चार वर्षानंतर आईचेही निधन झाले.

त्यानंतर दीनदयाळ यांचे संगोपन. परंतु दीना दहा वर्षाचा असताना, ते सुद्धा स्वर्गवासी झाले. मामा राधारमण यांनी दीनदयाळ च्या शालेय शिक्षणाकडे लक्ष दिले. याच दरम्यान त्यांचा अतिशय प्रिय लहान भाऊ शिवदयाळ याचा टायफाईडने मृत्यू झाला.

इतकी प्रतिकूलता असूनही, इतक्या मृत्यूचे धक्के पचवून दीनदयाळ अभ्यास करत होता. आजच्या सारख्या सुविधा त्या काळात नव्हत्या. सोबतच मामाचे उत्पन्नही साधारणच होते. त्यामुळे दीनदयाळ ला त्याच्यासोबत शिकणाऱ्या मामाच्या मुलाच्या पुस्तकांवर रात्रीच्या वेळी अभ्यास करावा लागत असे. त्याच्या कुशाग्र बुद्धीमुळे आणि प्रचंड परिश्रमामुळे त्या काळाच्या मॅट्रिकच्या परीक्षेत तो शाळेतून पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला. गणित हा त्याचा आवडता विषय होता. त्यातील भूमितीची दीनदयाळची उत्तर पत्रिका आदर्श उत्तरपत्रिका म्हणून अजमेर बोर्डात जपून ठेवण्यात आली होती. या दरम्यानचा एक प्रसंग दीनदयाळजींची विचार करण्याची पद्धत प्रकर्षाने दाखवून देतो.

सिकरच्या राजांना या हुशार विद्यार्थ्यांची माहिती मिळाली. त्यांनी दीनदयाळ ला दरबारात बोलवून त्याचे कौतुक करत विचारले, बक्षीस म्हणून तुला काय देऊ? महाराजांना आश्चर्यचकित करणारे उत्तर मिळाले, मला फक्त तुमचा आशीर्वाद द्या. महाराजांचा आशीर्वाद तर मिळालेच सोबत एक सुवर्णपदक आणि पुढच्या अभ्यासासाठी विद्यावेतन प्राप्त झाले. पुढील सर्व शिक्षण हे साधारणतः शिष्यवृत्ती वरच दीनदयाळांनी पूर्ण केले.

आपल्या जीवनातील सर्व संकटांचा, दुःखांचा आणि आव्हानांना दीनदयाळजींनी अतिशय सकारात्मक प्रतिक्रिया दिली. यातून स्वतःचे दीनदयाळ अर्थात गरिबांचा कैवारी हे नाव त्यांनी सार्थक केले.

दीनदयाळ हे स्वतः केवळ हुशार होते एवढेच नाही, तर शालेय जीवनापासूनच ते इतर विद्यार्थ्यांनाही अभ्यासात मदत करत. महाविद्यालयात तर त्यांनी एक वैशिष्ट्यपूर्ण मंडळ तयार केले ज्याचे नाव 'शून्य मंडळ' असे ठेवले. अनेक अनुत्तीर्ण झालेल्या किंवा अनुत्तीर्ण होण्याची भीती असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यामुळे इंटरच्या परीक्षेत उत्तीर्ण होता आले.



त्यांचा आत्मविश्वास वाढवण्याचे कामही या शून्य मंडळाने केले. इतरांना मदत करून सुद्धा इंटरच्या परीक्षेत दीनदयाळ सर्वाधिक गुणांचा विक्रम करत प्रथम क्रमांकाने गुणवत्ता यादीत झळकले.

**बूट पॉलिश वाला मुलगा**

दीनदयाळ एकदा रेल्वेने प्रवास करत होते. एक थोडा मळकट कपड्यातला मुलगा चप्पल, बूट पॉलिश करण्यासाठी फिरत होता. दीनदयाळनी त्याच्याकडून आपले बूट पॉलिश करून घेतले. यामागचे कारण, त्यांना पॉलिश चे बूट घालण्याची आवड होती असे नाही तर यानिमित्ताने सामान्य किंवा गरीब व्यक्तींना त्यांच्या कामातून दोन पैसे मिळावे हेच होते.

त्यांच्यासोबत प्रवासात सुटा बुटातले एक अधिकारी प्रवास करत होते. मुलाने त्यांनाही बूट पॉलिश करायचे आहेत का असे विचारले. त्या अधिकाऱ्यांनी मुलाला बूट स्वच्छ करण्यासाठी त्याच्याकडे कापड असेल तरच पॉलिश करण्याविषयी सांगितले.

मुलाजवळ तसा कपडा नसल्यामुळे थोडासा नाराज होऊन तो तिथून निघू लागला, तेव्हा दीनदयाळनी त्याला थांबवून आपल्या बॅगमधून जुन्या कपड्या मधला एक तुकडा व्यवस्थित फाडून दिला आणि त्याला अधिकाऱ्याचे बूट सुद्धा पॉलिश करता आले.

नंतर तो निघाला असताना दीनदयाळनी अगदी प्रेमाने त्याला सांगितले की ' बघ, आपल्याजवळ आपल्या कामासाठी आवश्यक सर्व साहित्य असले पाहिजे. आज कपडा नव्हता म्हणून तुझे नुकसान झाले असते'. कोणताही राग न करता किंवा आजूबाजूच्या स्थितीकडे दुर्लक्ष न करता दीनदयाळजी छोट्या छोट्या गोष्टींची काळजी घेत आणि त्यामुळेच ते खरे नावाप्रमाणे दीनदयाळ होते.

दीनदयाळ अनेक वर्ष अखिल भारतीय जनसंघ या राजकीय पक्षाचे सरचिटणीस होते. पक्ष कार्यासाठी सातत्याने प्रवास करत.

एकदा प्रवासामध्ये दीनदयाळसोबत एक श्रीमंत सहप्रवासी होते. डब्यात एक धडधाकट भिकारी देवाच्या नावाने भीक मागू लागला. त्या श्रीमंत व्यक्तीने खिशातून एक नाणे भिकाऱ्याच्या कटोऱ्यात टाकण्यासाठी काढले. पंडितजींनी हळुवारपणे त्यांना थांबवले.

काही वेळानंतर डब्यामध्ये एक आंधळा भिकारी मीराबाईची भजने गात लोकांना मदतीची मागणी करत होता. पंडितनी आता त्या श्रीमंत सहप्रवाशाला सांगितले की आधीचे नाणे तुम्ही देणार होता ते आता तुम्ही देऊ शकता. सहप्रवाशाने तसे केले. परंतु नंतर त्यांना विचारले की दोघेही तर भिकारीच आहेत मग आधी त्यांनी नाणं देण्यापासून का थांबवलं.

दीनदयाळ म्हणाले 'पहिला भिकारी धडधाकट होता, कोणतंही काम तो करू शकत होता. त्यामुळे त्यानी कष्ट करून आपले पोट भरले पाहिजे. त्याचे भिक मागणे हे समाजाला आणि देशाला लांछन आहे.

दुसरा भिकारी आंधळा असून सुद्धा गायन कला देवाचं नाव घ्यायला आणि सोबत पोट भरायला उपयोगात आणतो आहे. डोळस मदत कशी करावी याचा हा एक उत्तम परिपाठ त्यांनी या प्रसंगात घालून दिला आहे.

-------------------

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

# काँग्रेसची वेगळी रणनिती!

लवकरच होणारी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढणार आहे. २०१६ नंतर काँग्रेस प्रथमच, पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक कोणत्याही पक्षाशी आघाडी न करता लढणार आहे.२०१६ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने, मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडी बरोबर निवडणूक समझोता केला होता.त्या निवडणुकीत काँग्रेसला ४४ जागांवर विजय मिळाला होता. तर मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीला ३२ जागांवर विजय मिळाला होता. त्यावेळी काँग्रेस हा पश्चिम बंगाल विधानसभेतील सर्वात मोठा विरोधी पक्ष ठरला होता.

-----------------

२०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा काँग्रेसने मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडी बरोबर निवडणूक समझोता केला होता. त्या आघाडीत नौशाद सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखालील इंडियन सेक्युलर फ्रंटही सहभागी झाला होता. हे तीन पक्ष एकत्र येऊनही त्यांना २०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत चांगली कामगिरी करता आली नव्हती.



अभय गोखले

त्या निवडणुकीत काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीची पाटी कोरी राहिली होती. तर इंडियन सेक्युलर फ्रंटचे नेते नौशाद सिद्दीकी हे आघाडीतर्फे विधानसभेत निवडून आलेले एकमेव आमदार होते. काँग्रेसला तीन टक्के मते मिळाली होती.तर मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीला साडेपाच टक्के मते मिळाली होती.

एकेकाळी पश्चिम बंगालवर राज्य केलेल्या काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीला त्या निवडणुकीत, विधानसभेमध्ये आपला एकही आमदार निवडून आणता आला नव्हता. त्या उलट २०११ पर्यंत पश्चिम बंगाल मध्ये नगण्य असलेल्या भाजपाला २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत ७७ जागांवर विजय मिळाला होता आणि तो पक्ष विधानसभेतील मोठा विरोधी पक्ष ठरला होता.

ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस हा पक्ष २०११ साली पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर आल्यानंतर, त्या राज्यात विधानसभेच्या ज्या पोटनिवडणूका झाल्या, त्यांमध्ये तृणमूल काँग्रेसने मोठे यश मिळवले. मात्र २०२३ मध्ये सागरडिघी मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसने विजय मिळवला होता.

अर्थात काँग्रेसचा तो विजय क्षणिक ठरला.कारण काँग्रेसच्या विजयी उमेदवाराने थोड्याच दिवसात, तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. या पार्श्वभूमीवर लवकरच होणारी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक एकट्याच्या बळावर लढण्याचा काँग्रेसचा निर्णय धाडसीच म्हणावा लागेल.

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■

# जागतिक राजकारणात अडकलेली भारतीय शेती

(कालच्या अंकावरून पुढे)

-------------

या करारामुळे जीएम पिकांचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. अमेरिकन शेती मोठ्या प्रमाणावर जीएम पिकांवर आधारित आहे. भारतात जीएम पिकांबाबत सामाजिक, पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक चिंता आहेत. मुक्त व्यापारामुळे जीएम अन्नपदार्थांचा प्रवेश सुलभ झाल्यास अन्न सार्वभौमत्वाचा प्रश्न निर्माण होतो.

अन्न सार्वभौमत्व म्हणजे देशाला स्वतःच्या अन्न प्रणालीवर नियंत्रण असणे. जर भारताचा अन्न बाजार बहुराष्ट्रीय कंपन्या आणि विदेशी उत्पादकांच्या ताब्यात गेला, तर देशाची अन्न सुरक्षा आणि ग्रामीण स्वायत्तता धोक्यात येईल. जागतिक पातळीवर हा करार नव्या व्यापार व्यवस्थेचा भाग म्हणून पाहिला जात आहे.

विकास परसराम मेश्राम
मु+पो, झरपडा,
ता. अर्जुनी/मोर, जि. गोंदिया.
7875592800
vikasmeshram04@gmail.com

उत्तरार्ध

ट्रम्प प्रशासनाचा व्यापार धोरणांचा कल दबाव आणि शक्तीच्या वापरावर आधारित आहे. अनेक विश्लेषकांच्या मते हे जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांना छेद देणारे आहे. दबावाखाली देश झुकत असल्याने एक नवीन जागतिक व्यवस्था तयार होत आहे, जिथे शक्तिशाली देश नियम ठरवतात. विकासशील देशांसाठी हा प्रवाह धोकादायक आहे.

भारतासारख्या देशाने मुक्त व्यापार करताना धोरणात्मक स्वायत्तता राखणे अत्यंत आवश्यक आहे, अन्यथा देशाचा कृषी बाजार जागतिक भू-राजकीय रणनीतीचा भाग बनू शकतो. जीएम (Genetically Modified) पिकांचा मुद्दा देखील गंभीर आहे.

शेवटी, भारत-अमेरिका व्यापार करार हा दोन्ही देशांसाठी परस्पर लाभदायक आहे की असमान सौदा, हे कराराच्या संपूर्ण तपशीलावर अवलंबून आहे. योग्य सुरक्षा उपाय, सबसिडी सुधारणा, पायाभूत सुविधा आणि बाजार संरक्षण दिल्यास मुक्त व्यापार संधी ठरू शकतो.

परंतु बाजार पूर्णपणे उघडला गेला आणि स्थानिक शेतकऱ्यांना संरक्षण दिले गेले नाही, तर हा करार ग्रामीण भारतासाठी ऐतिहासिक धोका ठरू शकतो. शेती ही केवळ आर्थिक क्षेत्र नाही, तर सामाजिक स्थैर्य, लोकशाही आणि राष्ट्रीय सुरक्षेचा पाया आहे. त्यामुळे कोणताही व्यापार करार केवळ आकड्यांवर नव्हे, तर शेतकऱ्यांच्या जीवनावर आधारित असावा. मुक्त व्यापाराचे फायदे शहरात दिसू शकतात, पण त्याची किंमत गावांनी मोजली, तर विकासाची ही कथा अपूर्ण आणि अन्यायकारक ठरेल.

■ ■ ■

## स्मृतीचे राजकारण : विसराच्या अंधारात ढकलले जाणारे राष्ट्रपुरुष

वाचक लिहितात

दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी दैनिक महासागर मध्ये प्रकाशित प्रवीण बागडे लिखित शासन निर्णयातून वगळले गेलेले राष्ट्रपुरुष आणि अस्वस्थ करणारे वास्तव : स्मृतीचे राजकारण हा लेख वाचताना मन सुन्न होतं. हा लेख वाचकाला केवळ विचार करायला लावत नाही, तर अस्वस्थ करतो, प्रश्न विचारायला भाग पाडतो.

एखाद्या राष्ट्राच्या जडणघडणीत ज्यांचे विचार, संघर्ष आणि त्याग मोलाचे ठरले, असे राष्ट्रपुरुष आज शासन निर्णयांतून, अभ्यासक्रमांतून, अधिकृत स्मृतींतून हळूहळू वगळले जात आहेत, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. स्मृती जपणं ही केवळ भावनिक गोष्ट नाही, तर ती लोकशाहीची जबाबदारी आहे. पण आज स्मृतीही राजकीय सोयीस्करतेनुसार निवडल्या जात असल्याचं भयावह वास्तव या लेखातून समोर येतं.

इतिहास म्हणजे केवळ सत्ता जिंकणाऱ्यांची कथा नाही; तो वंचितांचा आवाज, संघर्षशील विचारवंतांचा वारसा आणि समाजपरिवर्तनासाठी झगडणाऱ्या व्यक्तींची साक्ष असतो. मात्र, जेव्हा शासन निर्णयांतून काही विशिष्ट विचारधारा न पटणारे राष्ट्रपुरुष वगळले जातात, तेव्हा तो इतिहासाचा नव्हे तर भविष्याचा घात ठरतो.

प्रवीण बागडे यांनी अत्यंत स्पष्ट शब्दांत दाखवून दिलं आहे की, स्मृतीचं राजकारण हे केवळ भूतकाळ पुसत नाही, तर वर्तमानाला दिशाहीन करतं. आज जर आपण मौन बाळगलं, तर उद्या आपल्या प्रश्नांनाही इतिहासातून वगळलं जाईल.

हा लेख म्हणजे इशारा आहे, विचार करणाऱ्या प्रत्येक नागरिकासाठी. राष्ट्रपुरुषांना विसरणं म्हणजे राष्ट्रालाच विसरणं. त्यामुळे स्मृती जपणं ही केवळ श्रद्धांजली नसून, ती लोकशाही टिकवण्याची लढाई आहे. हा लेख वाचून अस्वस्थ होणं स्वाभाविक आहे; पण त्या अस्वस्थतेतूनच प्रश्न, प्रतिकार आणि जागृती जन्माला येईल, हीच अपेक्षा.

■ प्रमोद जांभूळकर
नागपूर .

## व्हॅलेंटाईन डे पाश्चात्य विकृती

दरवर्षी १४ फेब्रुवारीला ईसाई संत वेलेंटाईन यांच्या स्मरणार्थ प्रेमाचा दिवस म्हणून जगभरात साजरा केला जातो. या दिवशी आपल्या प्रिय व्यक्तीला फुले विशेषतः लाल गुलाब, चॉकलेट, गिफ्ट दिले जातात.

हा दिवस पश्चिमी ईसाई धर्माचा उत्सव होता आता तो रोमँटिक प्रेमाचे प्रतीक झाले आहे. पूर्वी फक्त १४ फेब्रुवारीला व्हॅलेंटाईन डे साजरा केला जात असे आता तो ७ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी यादरम्यान साजरा केला जातो. सात ते चौदा हा सप्ताह विविध डे जसे रोज डे, प्रपोज डे, चॉकलेट डे, टेडी डे, प्रॉमिस डे, हग (आलिंगन) डे, किस (चुंबंन) डे आणि व्हॅलेंटाईन डे म्हणून साजरा केला जातो. तर त्याचा त्यानंतरचा सप्ताह अँटी व्हॅलेंटाईन डे म्हणून साजरा केला जातो.

प्रेम ही नैसर्गिक भावना आहे म्हणूनच काही न सांगता मुलाची व्यथा आईला समजते, ठेच लागल्यावर, भीती वाटल्यावर आपल्या तोंडून आई-वडिलांचे नाव निघते .

संत निरपेक्ष प्रेम करतात. गिफ्ट, फुले,चॉकलेट देऊन प्रेमाचे प्रदर्शन करत नाही हे करणे म्हणजे आपला प्रेमावर विश्वास नसल्याचे दर्शवित आहे. व्हॅलेंटाईन सप्ताह साजरे होणारे वेगवेगळे दिवस भौतिक सुख, अधर्माचारण करणारेच असतात.

सनातन हिंदू धर्मात चराचरात ईश्वराचे अस्तित्व मानून सर्वांवर निरपेक्ष प्रेम प्रीती करायला शिकवते. वेगवेगळी आमिष, प्रलोभन देऊन प्रेमाची जोर जबरदस्ती केली जात नाही.

हा प्रेमाचा दिवस म्हणून साजरा केला जातो तर पुलवानमध्ये निरपराध लोकांची हत्या करणे हे प्रेमाचे कोणते स्वरूप आहे. व्यभिचार करणे, हिंदू तरुणींना फसवणे हे पण प्रेमाचे कोणते स्वरूप आहे. पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधानुकरण करण्याच्या नादात आपण त्यांचे सण उत्सव साजरे करू लागलो आहोत ही खेदाची गोष्ट आहे आणि याचे भान आज राहिलेले नाही.

सनातन धर्माची महानता विदेशी लोक जाणून आपल्याकडे येऊन ते शिकून समजून घेऊन आचरणात आणत आहे आणि आत्मनंदाचा अनुभव घेत आहे. आपण करंटे आहोत जे शाश्वत, सुंदर, पवित्र आहे त्याकडे दुर्लक्ष करत आहोत आणि पाश्चिमात्य विकृती आपण जोपासत आहोत. आपला धर्म, त्याचे शिक्षण आणि आचरण करून मनुष्य जन्माचे सार्थक करणे गरजेचे आहे.

■ लीना मकरंद गाडगीळ
पनवेल.

# जगण्यातील संवेदना आणि फुललेल्या कविता : दिगंबर जाधव

परमेश्वराने मानवाला दिलेले जीवन किती सुंदर आहे, असे आपण एका बाजूला म्हणतो; पण त्याच वेळी हेच जीवन संघर्ष, यातना आणि दुःखांनी किती खोलवर व्यापलेले आहे, याचे भानही आपल्याला येते. हीच जगण्यातील भयावह विसंगती, जी मनाला अस्वस्थ करते आणि तरीही माणसाला घडवत राहते. कुणी भाकरीच्या एका तुकड्यासाठी जीवाचे रान करतो, तर कुणी गर्भश्रीमंतीच्या झगमगाटातही जगण्यातील उणीवांचा शोध घेत सैरभैर होतो.

या दोघांच्याही वेदना त्यांच्या त्यांच्या पातळीवर समतुल्यच असतात. मात्र या संघर्षातून मानव केवळ तग धरत नाही, तर खऱ्या अर्थाने समृद्ध होतो, कारण संघर्षच जीवनाला अर्थ देतो. याच संघर्षातुन कुणाचा कणा ताठ होतो, तर कुणी संवेदनशील कवी म्हणून शब्दांच्या वाटेने उभा राहतो. अशाच ग्रामीण मातीतून जन्माला आलेले कवी, लेखक म्हणजे दिगंबर जाधव.

असे म्हटले जाते की खऱ्या भारताचे समग्र दर्शन खेड्यांतूनच घडते. शेतात राबणारा शेतकरी आपल्या हाडामांसाचे मातेरं केल्याशिवाय पीक उभे करू शकत नाही. कर्जाच्या नोटा त्याचे अख्खे आयुष्य जाळत असतात. त्या शेतात खांद्याला खांदा लावून राबणाऱ्या स्त्रिया त्याच्या नशिबाच्या खऱ्या भागीदार असतात. स्त्रियांच्या वेदना, त्यांच्या अपूर्ण आकांक्षा आणि त्या पूर्ण करण्यासाठी चाललेला अखंड संघर्ष, या साऱ्या ग्रामीण वास्तवाला अत्यंत जवळून अनुभवणारे कवी दिगंबर जाधव यांनी हे जगणे कवितांच्या रूपाने शब्दबद्ध केले आहे. ते लिहितात....

*बारमाही अन्नदात्याचं*
*फाटक्या लक्तराचं जिणं*
*तरीही जगासाठी पिकवितो*
*सदैव मातीतून सोनं*

शेतकरी आणि समग्र ग्रामीण जीवनाचे वास्तव शब्दांत ताकदीने उभे करणारे कवी, लेखक दिगंबर जाधव यांचा जन्म अतिशय गरीब परिस्थितीतील शेतकरी कुटुंबात झाला. वडील बापूराव जाधव आणि आई गिरजाबाई बापूराव जाधव यांच्या संस्कारांतून त्यांचे बालपण घडले. हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील सांडस हे गाव, शेतकऱ्यांच्या अनंत यातनांचे, भोगांचे आणि अठरा विश्व दारिद्र्याचे प्रतीक–ही परिस्थिती त्यांनी अगदी जवळून पाहिली. मात्र आई-वडिलांकडून मिळालेल्या श्रमप्रतिष्ठेच्या बाळकडूने त्यांनी कधीही श्रमाची लाज बाळगली नाही.

शेतावर मजूर म्हणून काम करत असतानाच सांडस येथे पहिली ते चौथी आणि पुढे तालुक्यात पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, या ठाम विश्वासातून त्यांनी इतिहास आणि मराठी वाङ्मयात एम. ए. तसेच बी. एड. ही पदवी संपादन केली.

घरातील वारकरी संप्रदायाची परंपरा, भजन, कीर्तनांचा जागर आणि लहानपणापासूनची वाचनाची आवड, यांमुळे मराठी साहित्याची गोडी त्यांच्या मनात खोलवर रुजली.



२७ जून १९९७ रोजी वारंगा येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून ते रुजू झाले. या दिवसापासून त्यांच्या जीवनात आनंदाने जसा प्रवेश केला, तसाच प्रतिभेनेही आपली चाहूल दिली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवत असताना, स्वतःच्या आयुष्यात अनुभवलेल्या परिस्थितीशी प्रतिभेचा सुरेख मेळ घालत त्यांच्या कविता फुलू लागल्या.

याच प्रवासातून त्यांचा पहिला कवितासंग्रह मातीतलं सोनं प्रकाशित झाला. या संग्रहात एकूण ८९ कविता असून निसर्गाच्या दुष्टचक्रात अडकलेल्या केविलवाण्या शेतकऱ्याची काव्यगाथा त्यातून उलगडते. भोग भोगल्याशिवाय शेतकऱ्याला जगता येत नाही, हे विदारक वास्तव कवी अत्यंत प्रामाणिकपणे मांडतात.




mahasagarngp@gmail.com

शेतकऱ्यांच्या व्यथा मांडताना ते स्त्रीभावनाही तितक्याच ताकदीने शब्दबद्ध करतात. परिस्थिती आणि प्रतिभा यांच्या संघर्षातूनच कवी घडतो, हे ते आपल्या लिखाणातून अधोरेखित करतात. मानवी वेदनांना शब्दांची धार देत ते लिहितात....

*कुठे होता जीव सुखी तुझे दुःख पाहून राया*
*भरलेल्या घरामध्ये होती कासावीस काया*

सौभाग्याचं लेणं या वास्तववादी कवितेत दोन्ही किडन्या गमावलेल्या पतीसाठी पत्नी स्वतःची किडनी देते; मात्र पाच वर्षांनी तो पती मृत्युमुखी पडतो. या कवितेतील हृदयस्पर्शी ओळी त्या स्त्रीची अपरिहार्यता आणि तिचे निःशब्द बलिदान व्यक्त करतात.

लक्तराचं जिणं या कथासंग्रहात अपत्य न झालेली पत्नी स्वतःच्या पतीला दुसरे लग्न करण्यास भाग पाडते आणि शेवटी तिचे आयुष्य कसे लक्तर होते, याचे विदारक चित्रण कवीने अत्यंत संवेदनशीलतेने केले आहे. रानपाखरू आणि आधुनिक सती सावित्री या कथांतून स्त्रीविश्वाच्या विविध भावछटा रंगवल्या आहेत.

गझल या काव्यप्रकारातही ते निष्णात असून आई-वडिलांवरील प्रेम, पती-पत्नीमधील नातेसंबंध, भाऊ-बहिणीतील स्नेह यांवर आधारित लावण्यवती हा गझलसंग्रह त्यांनी लिहिला आहे. जगण्यातील विदारकता जितक्या ताकदीने ते मांडतात, तितक्याच तरलतेने प्रेमाचे रंगही उलगडतात. तुकोबाची वारकरी हा अभंगसंग्रहही त्यांच्या साहित्यप्रवासाचा महत्त्वाचा भाग आहे.

आपल्या साहित्यिक जडणघडणीत मावस भाऊ व प्रसिद्ध साहित्यिक फ. मु. शिंदे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत, डॉ. जगदीश कदम, डॉ. इंद्रजीत भालेराव तसेच कुसुमाग्रज आणि मंगेश पाडगावकर यांचा सदैव प्रभाव राहिल्याचे ते कृतज्ञतेने सांगतात.

३१ वर्षांचा सहाय्यक शिक्षक म्हणूनचा प्रवास उलगडताना ते अभिमानाने सांगतात की आतापर्यंत चार शाळांमध्ये त्यांनी कार्य केले. विद्यार्थ्यांमधील सुप्त प्रतिभा ओळखून त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास घडविण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात.

साहित्याची गोडी निर्माण व्हावी म्हणून सकाळच्या परिपाठात त्यांच्या कवितांचे वाचन विद्यार्थ्यांकडून करून घेतात, पाठांतर व सादरीकरण घडवतात, वाचलेल्या कवितांचे मर्म लिहिण्यास प्रवृत्त करतात. अशा प्रकारे वाचनझलेखन संस्कृती रुजविणारे उपक्रम ते राबवतात.

आभासी माध्यमातून विविध साहित्यिकांशी विद्यार्थ्यांची भेट घडवून देतात आणि समृद्ध ग्रंथालयातून पुस्तके विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवतात. याच परिश्रमांचे फळ म्हणून अनेक विद्यार्थी आज कविता व लेखन करू लागले आहेत.

विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकास व्हावा यासाठी ते सांस्कृतिक उपक्रम, खेळ आणि कार्यानुभव यांसारखे सृजनशील कार्यक्रम घेतात. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या परिस्थितीची जाण असलेला एक प्रसंग ते सांगतात..... अत्यंत गरीब विद्यार्थ्याला दर शुक्रवारी भाजी खरेदीसाठी ६० रुपये देत. तो विद्यार्थी त्या पैशातून भाजी विकत घेऊन विक्री करायचा, नफा स्वतःकडे ठेवायचा आणि मुद्दल परत करायचा. आज तोच विद्यार्थी मोठा व्यापारी झाला आहे. आज मी जो काही आहे, ते आपल्या सहकार्यामुळे, असे तो म्हणतो, तेव्हा त्या शब्दांतच आपले सार्थक सामावल्याची भावना कवी व्यक्त करतात.

सांडस हे गुरुजींचे माहेरघर, इथेच त्यांनी कलेचे बाळकडू घेतले. त्यांच्या वडिलांना अवघे गाव तात्या म्हणायचे. तात्याचा मुलगा तात्याचा वारसा चालवतो, असे मित्र भागवतराव निरगुडे अभिमानाने सांगतात. कवी फ. मु. शिंदे आणि जाधव मास्तर एकाच कुटुंबातील असल्याने संस्कारांची ही परंपरा अखंड राहिली आहे. विद्यार्थी घडवणारा आणि साहित्याला न्याय देणारा साहित्यिक अशी ओळख आज राज्यभर दिगंबर जाधव मास्तरांनी निर्माण केली आहे.

शेतकऱ्यांचे पुरात वाहून गेलेले पीक, वादळ, स्त्रियांवरील अन्याय, हुंडाबळी यांसह सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज, जिजाऊ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर त्यांनी एकूण ३१९ कविता लिहिल्या आहेत. या उल्लेखनीय साहित्यिक कार्यामुळे ते केवळ विद्यार्थ्यांतच नव्हे, तर मराठवाड्यातील ग्रामीण कवी, लेखक म्हणून नावलौकिकास आले आहेत.

या कार्याची दखल घेत त्यांना साहित्यरत्न पुरस्कार (लातूर), हिंगोली जिल्हा ज्ञानरत्न पुरस्कार तसेच ग्रामीण कवितांसाठी विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, मराठवाडा साहित्य संमेलन आणि राज्यस्तरीय काव्यसंमेलनांमध्ये ते निमंत्रित कवी म्हणून सहभागी होतात.

श्रमप्रतिष्ठा आणि वारकरी परंपरेच्या संस्कारांतून घडलेले कवी दिगंबर जाधव आजही आपल्या मातीशी घट्ट जोडलेले आहेत. सुट्टीच्या दिवशी ते स्वतः शेतात नांगरणी करतात, तरुणांना श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व कळावे आणि कार्यप्रवणतेची जाणीव व्हावी, हा त्यामागचा उदात्त हेतू. गरजू लोकांना मदत करून समाजाचे ऋण फेडण्याची भावना ते जपतात आणि हीच संवेदना त्यांच्या लेखनातून सतत झळकत राहते.

सेवानिवृत्तीनंतर विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्याची आणि मी कसा घडलो हे आत्मचरित्र लिहिण्याची इच्छा ते व्यक्त करतात.

परिस्थिती आणि प्रतिभा यांचा सुरेख मेळ घालत उंच भरारी घेतलेल्या कवीझलेखक दिगंबर जाधव यांच्या प्रतिभेच्या कळ्या अशाच फुलत राहोत आणि त्यांच्या शिक्षकी व्यक्तिमत्त्वातून विद्यार्थ्यांचे जीवन अधिक समृद्ध होत राहो,यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

--------------------

दिगंबर जाधव संपर्क क्रमांक
9922510375

■ ■ ■

# फॅटी लिव्हर ग्रेड-२ च्या निदानाचा अर्थ काय?





आजच्या धावपळीच्या जीवनात फास्ट फूडचे प्रमाण वाढल्याने त्यातच शरीराची हालचाल होत नसल्याने अनेक आजार होत आहेत. त्यात फॅटी लिव्हरच्या प्रकरणातही वाढ होत आहे. अल्ट्रा साऊंड रिपोर्टमध्ये फॅटी लिव्हर ग्रेड-२ चे निदान होणे सामान्य झाले आहे. ग्रेड-२ चे निदान झाल्यानंतर अनेक लोक घाबरतात. त्यांना वाटते हा गंभीर आजार आहे. ग्रेड-२ फॅटी लिव्हर म्हणजे नेमके काय असते? हा का होतो ? याचे कंट्रोल कसे केले जाऊ शकते?

फॅटी लिव्हर हा कॉमन आजार झाला आहे. मात्र, प्रत्येक व्यक्तीला ग्रेड-२ होत नाही. बहुतांश प्रकरणे ही ग्रेड-१ ची असतात. मात्र, ग्रेड-२ चा अर्थ आजार सुरु झाला आहे आणि याला वेळेवर कंट्रोल करणे गरजेचे आहे. जेव्हा कोणा व्यक्तीच्या लिव्हरच्या पेशी जास्त फॅट होते, तेव्हा यास फॅटी लिव्हर म्हटले जाते. याच्या विविध ग्रेड असतात. ग्रेड-२ मध्ये जास्त फॅट जमा होते. आधी ही समस्या दारु पिणाऱ्यामध्ये पाहायला मिळाली होती. आता दारु न पिणाऱ्यांमध्येही हा आजार होत आहे.

**फॅटी लिव्हर ग्रेड-२ चा अर्थ काय?**

जेव्हा लिव्हरमध्ये फॅट जमते तेव्हा त्यास तातडीने कमी करण्याची गरज असते. या स्टेजमध्ये खान-पान आणि लाईफस्टाईलमध्ये बदल करुनही समस्येवर नियंत्रण करता येते. काही प्रकरणात औषधाची देखील गरज असते. बहुतांशी लोकात ही स्टेज सहज नियंत्रणात येते. परंतू याकडे दुर्लक्ष केले तर पुढे जाऊन लिव्हर सिरोसिस पासून ते लिव्हर फेल होईपर्यंत स्थिती उद्भवू शकते.

फॅटी लिव्हर ग्रेड-२ असा टप्पा आहे. ज्यात आजाराला नियंत्रित देखील करता येते. परंतू अनेक लोक याला हलक्यात घेतात आणि खाण्यापिण्याचे नियम पाळत नाहीत, त्यामुळे पुढे जाऊन हा आजार गंभीर स्वरुप धारण घेऊ शकतो असे डॉ. कुमार यांनी म्हटले आहे.

**फॅटी लिव्हर ग्रेड-२ कशामुळे होत असतो ?**

जास्त तळलेले पदार्थ खाणे
जंक फूड खाणे
लठ्ठपणा आणि पोटाची अतिरिक्त चरबी
हाय कोलेस्ट्रॉल
एक्सरसाईज न करणे

**फॅटी लिव्हर ग्रेड-२ चे लक्षण काय असतात?**

कायम थकवा येणे
पोटाच्या उजव्या बाजूला जडपणा आणि हलके दुखणे
भूक कमी लागणे
वजन वेगाने वाढणे
अपचनाची समस्या


फॅटी लिव्हर ग्रेड-२ काय केल्यास औषधांची गरज लागणार नाही

रोज किमान ३० मिनिटे एक्सरसाईज करा
वजन घटवा, फास्ट फूडपासून दूर रहा
हिरव्या भाज्या आणि मौसमानुसार फळांचा आहारात समावेश करावा.

■ ■ ■

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## प्रेमाची बाराखडी

भाषेची बाराखडी शिकण्या
करावे लागती प्रयास
अव्यक्त प्रेमाची भाषा
व्यक्ती समजते अनायास

'हार्ट टू हार्ट ' असते
भाऊ हे संदेशवहन
ते जुमानत नाही
कोणतेच तत्वज्ञान गहन ..

वेळप्रसंगी धर्म प्रांताच्या
सिमारेषाही ओलांडते
नाही झाले साध्य तर
बलिदान ही स्वीकारते ..

व्यावहारिक जगाला
हे पटणार तरी कसे ?
'हम बने तुम बने ' हे
त्यांच्या शब्दकोषातही नसते

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सी.जी.डी.एल.-अ.-०८१२२०२५-२६८३३२
CG-DL-E-०८१२२०२५-२६८३३२

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II - खण्ड ३ - उप-खण्ड (ii)
PART II-Section ३-Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं.5467 नई दिल्ली, सोमवार, दिसम्बर ८, २०२५ / अग्रहायण १७, १९४७
No.5467 NEW DELHI, MONDAY, DECEMBER 8, 2025/AGRAHAYANA 17, 1947

**सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय**
**अधिसूचना**
**नई दिल्ली, ८ दिसम्बर, २०२५**

का.आ. ५६५५(अ).ड्ड केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम १९५६ (१९५६ का ४८) (जिसे इसमें इसके पश्चातब उक्त अधिनियम कहा गया है) की धारा ३क की उप-धारा (१) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चातब कि महाराष्ट्र राज्य के अकोला जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६१-जी, के कि.मी. ०/००० से कि.मी ४२/१०० तक के भूखंड का निर्माण (चौडाकरने, पेव्ड शोल्डर सहित दो लेन/चार लेन का बनाने, आदि) अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा ३ग की उप-धारा (१) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा ।

ऐसी प्रत्येक आक्षेप सक्षम प्राधिकारी, तथा उपविभागीय अधिकारी बाळापुर को लिखित रूप मे किया जायगा और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप मे या किसी विधि व्यवसायी द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आक्षेपो की सुनवाई के पश्चातब तथा ऐसी और जाँच करने के पश्चातब, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा। उक्त अधिनियम की धारा ३ग की उप-धारा (२) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा ।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

**अनुसूची**

महाराष्ट्र राज्य के अकोला जिले मे राष्ट्रीय राजमार्ग संख्या १६१-जी के कि.मी. ०/००० से कि.मी. ४२/१०० के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण.

| राज्य का नाम महाराष्ट्र | | | जिले का नाम :अकोला | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफळ (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफळ (हेक्टेयर) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| तालुका का नाम : पातुर | | | | | |
| गांव का नाम :हिंगणा | | | | | |
| १ | १४७ | निजी | कृषिक | ०.१११ (हेक्टेयर) | ०.१११ |
| २ | १४८ | निजी | कृषिक | ०.२१ (हेक्टेयर) | ०.२१ |
| ३ | २५ | निजी | कृषिक | ०.००२ (हेक्टेयर) | ०.००२ |
| ४ | २६ | निजी | कृषिक | ०.०८१ (हेक्टेयर) | ०.०८१ |
| ५ | २७ | निजी | कृषिक | ०.१८ (हेक्टेयर) | ०.०१८ |
| ६ | ०६ | निजी | कृषिक | ०.०७३ (हेक्टेयर) | ०.०७३ |
| गांव का नाम : दिग्रस खु. | | | | | |
| ७ | १० | निजी | कृषिक | ०.०२७ (हेक्टेयर) | ०.२७ |
| ८ | ५९ | निजी | कृषिक | ०.००३ (हेक्टेयर) | ०.००३ |
| ९ | ६२ | निजी | कृषिक | ०.०१८ (हेक्टेयर) | ०.०१८ |
| १० | ६८ | निजी | कृषिक | ०.०३१ (हेक्टेयर) | ०.०३१ |
| गांव का नाम :बाभुळगाव | | | | | |
| ११ | ८४ | निजी | कृषिक | ०.०२४ (हेक्टेयर) | ०.०२४ |
| १२ | ०९ | सरकारी | अकृषिक | ०.००४ (हेक्टेयर) | ०.००४ |
| गांव का नाम : देऊळगाव | | | | | |
| १३ | २४९ | निजी | कृषिक | ०.०११ (हेक्टेयर) | ०.०११ |
| १४ | २५४ | निजी | कृषिक | ०.०११ (हेक्टेयर) | ०.०११ |
| १५ | २५९ | निजी | कृषिक | ०.०७५ (हेक्टेयर) | ०.०७५ |
| १६ | २७१ | निजी | कृषिक | ०.०२८ (हेक्टेयर) | ०.०२८ |
| १७ | २७९ | निजी | कृषिक | ०.०२५ (हेक्टेयर) | ०.०२५ |
| १८ | ७ | निजी | कृषिक | ०.०७७ (हेक्टेयर) | ०.०७७ |
| | | | | Total | ०.८२९ |

फा. सं. RW/N>H-12014/135/2024-MAH/Zone-IV/3A3]
शेख अमीनखान, निदेशक

**MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS**
**NOTIFICATION**
New Delhi, the 8th December, 2025

**S.O. 5655(E).-** In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required for **Building (Widening/Two lane with paved shoulder/four laning etc.),maintenance,management and operation of National Highway No.161-G in the stretch of land from Km 0/000 to Km. 42/100 in the district of Akolain the state of MAHARASHTRA,** hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, raise objections to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, the Sub Divisional Officer Balapur, in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either Allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final. The land plans and other details of the land to be covered under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

**SCHEDULE**

Brief description of the land to be acquired, with or without structure falling NH-161G within the stretch of the land from Km 0/000 to Km 42/100 in the District of Akola in the state of Maharashtra.

| State: MAHARASHTRA | | | District: AKOLA | | |
|---|---|---|---|---|---|
| SI NO. | Survey/plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Local Unit) | Area (in Hectares) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| Taluk : Patur | | | | | |
| Village : Hingaha | | | | | |
| 1. | 147 | Private | Arriculture | 0.111(Hectare) | 0.111 |
| 2. | 148 | Private | Arriculture | 0.21(Hectare) | 0.21 |
| 3. | 25 | Private | Arriculture | 0.022(Hectare) | 0.002 |
| 4. | 26 | Private | Arriculture | 0.081(Hectare) | 0.081 |
| 5. | 27 | Private | Arriculture | 0.018(Hectare) | 0.0 |
| 6. | 6 | Private | Arriculture | 0.073(Hectare) | 0.073 |
| Village : Digras Khu | | | | | |
| 7. | 10 | Private | Arriculture | 0.027(Hectare) | 0.073 |
| 8. | 59 | Private | Arriculture | 0.003(Hectare) | 0.003 |
| 9. | 62 | Private | Arriculture | 0.018(Hectare) | 0.018 |
| 10 | 68 | Private | Arriculture | 0.031(Hectare) | 0.031 |
| Village : Babhulgaon | | | | | |
| 11. | 84 | Private | Arriculture | 0.024(Hectare) | 0.024 |
| 12. | 9 | Government | Non- Arriculture | 0.004(Hectare) | 0.004 |
| Village : Deulgaon | | | | | |
| 13. | 249 | Private | Arriculture | 0.011(Hectare) | 0.011 |
| 14. | 254 | Private | Arriculture | 0.011(Hectare) | 0.011 |
| 15. | 259 | Private | Arriculture | 0.075(Hectare) | 0.075 |
| 16. | 271 | Private | Arriculture | 0.028(Hectare) | 0.028 |
| 17. | 279 | Private | Arriculture | 0.025(Hectare) | 0.025 |
| 18. | 7 | Private | Arriculture | 0.077(Hectare) | 0.077 |
| | | | | **Total** | **0.829** |

जा.क्र./जिमाका/अकोला/जाहिरात/१५४/२०२६

[F. No. RW/NH-12014/135/2024-MAH/Zone-IV/3A3]
SHAIKH AMINKHAN, Director



# जिल्हाधिकारी कार्यालयात ‘सुरक्षित इंटरनेट दिवस’ साजरा
## इंटरनेटचा विवेकपूर्ण वापर आवश्यक,मान्यवरांचे आवाहन

**▪अकोला,दि.१० (प्रतिनिधी)▪**

ई-महाजालाचा जीवनाची विविध अंगे व्यापून टाकणारा विस्तार व कृत्रिम बुद्धिम त्तेच्या आजच्या काळात इंटरनेटचा वापर विवेक व सजगता बाळगून करणे आवश्यक आहे, असे आवाहन विविध मान्यवरांनी केले. जिल्हा माहितीविज्ञान कार्यालयातर्फे ‘सुरक्षित इंटरनेट दिवस’ नियोजनभवनात साजरा करण्यात आला. अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, उपजिल्हाधिकारी विजय पाटील, उपजिल्हाधिकारी महेश परंडेकर, निखिल खेमनार, जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार, जिल्हा माहितीविज्ञान अधिकारी अनिल चिंचोले, अति. जि. मा. विज्ञान अधिकारी श्रीनिधी वाजपेयी, सायबर



सेलच्या पोलीस अधिकारी मनीषा तायडे यांच्यासह अधिकारी- कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

प्रारंभी सर्वांना इंटरनेट सुरक्षित वापराची शपथ देण्यात आली. डिजीटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्टबाबत श्रीमती वाजपेयी यांनी सविस्तर सादरीकरण केले. सायबर सेलतर्फे आशिष आमले यांनी सजग ऑनलाईन व्यवहार व दक्षतेबाबत माहिती दिली. महाजालातील आपली माहिती सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक उपाययोजना व दक्षतेबाबत श्री. चिंचोले यांनी प्रास्ताविकातून माहिती दिली. ऋषिकेश आग्रे यांनी सूत्रसंचालन केले.

# नरनाळा महोत्सव चित्ररथाचा शुभारंभ

**▪अकोला,दि..१० (प्रतिनिधी)▪**

सातपुड्यात वसलेल्या मेळघाटचे वनवैभव, इतिहास व संस्कृतीचे दर्शन घडविणारा नरनाळा महोत्सव दि. १५ ते १७ फेब्रुवारी दरम्यान होणार असून, महोत्सवाबाबत जनजागृतीसाठी चित्ररथाचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत आज झाला.

हा चित्ररथ जिल्ह्यात ठिकठिकाणी पोहोचून महोत्सव उपक्रमाची माहिती पोहोचविण्यात येणार आहे.अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, उपजिल्हाधिकारी विजय पाटील, महेश परंडेकर, निखील खेमनार, अधिक्षक श्याम धनमने, ऋषिकेश आग्रे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनात नरनाळा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, जंगल सफारी, साहसी खेळ व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या सम ावेश आहे. महोत्सवाच्या प्रत्येक दिवशी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. ‘चला हवा येऊ द्या’, ‘शिवशंभू गर्जना’, तसेच प्रसिद्ध गायक कैलास खेर यांची ‘लाईव्ह कॉन्सर्ट’ असे नामवंत कलावंतांचा समावेश असलेले कार्यक्रम महोत्सवाचे खास आकर्षण ठरणार आहे. महोत्सवाबाबत चित्ररथाच्या माध्यमातून आहे.

# श्री संत सेवालाल महाराज यांची ‘अखंड ज्योतिचे’ पातूर येथे पूजन करून स्वागत!

**▪पातुर,दि.१० (प्रतिनिधी)▪**

बंजारा समाजाची काशी पोहरादेवी येथून श्री संत सेवालाल महाराज यांची ‘ अखंड ज्योत ‘ आणण्यासाठी ४ ते ८ फेब्रुवारी दरम्यान पोहरादेवी ते खापरखेडा (शेकापूर ) पायदळ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते .रविवार आठ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता श्री संत सेवालाल महाराज यांची ‘ अखंड ज्योतिचे ‘ उत्साहात पातूर येथील टिकेव्ही चौकात उत्साहपूर्ण वातावरणात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुजन व स्वागत करण्यात आले. पोहरादेवी येथून पातुर कडे पादळ दिंडी येत असताना ठिकठिकाणी दिंडीचे स्वागत व पूजन करण्यात आले.




त्यामध्ये सरपंच अरविंद जाधव, तालुका अध्यक्ष अतिश राठोड, गणेश राठोड, राजेश जाधव, पत्रकार संजय गोतरकार, पत्रकार नामदेव जाधव, विठ्ठल काळे, सतीश राठोड, घमराज राठोड, अनिल पवार, राहुल राठोड, विनोद हिवराळे, पातुर वासीयांनी पूजन करून आशीर्वाद घेतले. अखंड ज्योत दिंडी ८ फेब्रुवारीला सायंकाळी खापरखेडा( शेकापूर) येथे पोहोचली .येथे महापूजा व दिंडीचे विसर्जन करण्यात आले आणि पुढील सात दिवस वृत्त वैकल्प उपवास करून सात दिवसाचा सप्ताह पाळण्यात येईल .

आणि १५ फेब्रुवारीला संत सेवालाल महाराज जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येईल. या अखंड ज्योत पायदळ दिंडीमध्ये गजानन पवार, अशोक राठोड, नितीन जाधव, अविनाश राठोड, राजेश राठोड, प्रवीण पवार, गणेश चव्हाण, अभिषेक उगले, अरविंद राठोड, ओम राठोड, मनोज राठोड, अमोल चव्हाण, राजेश जाधव, आशिष राठोड, सचिन जाधव, रंजीत राठोड, अभिजीत राठोड, सुरज राठोड, युवराज राठोड, यांनी पोहरादेवीचे खापरखेडा (शेकापूर) पर्यंतचा पायदळ प्रवास पायात पादत्राणे न घालता अनवाणी पायाने केला


**CHANGE IN NAME**
We have Changed Name Form
**RESHMA JAHAN AMINUDDIN KHAN**
TO
**RASHMA JAHAN**
**Passport No-J7753334**
My residential Address in Nirman Nagar, Balapur bay Pass plot no .63 care of Santosh Golden Transport Akola 444001

**CHANGE IN NAME**
We have Changed Name Form
**AMINUDDIN KHAN**
TO
**AMEENUDDIN KHAN**
**Passport No-J7753334**
My residential Address in Nirman Nagar, Balapur bay Pass plot no.63 care of Santosh Golden Transport Akola 444001

**CHANGE IN NAME**
We have Changed Name Form
**AAYSHA JAHAN AMINUDDIN KHAN**
TO
**AYESHA JAHAN AMEENUDDIN KHAN**
Passport No- R5366126
My residential Address in Nirman Nagar,Balapur bay Pass plot no.63 care of Santosh Golden Transport Akola 444001


अकोला दि. १० फेब्रुवारी २०२६ - आज दि. १० फेब्रुवारी २०२६ रोजी नायगाव ट्रान्सफर स्टेशन येथे उपमहापौर अमोल गोगे यांनी भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. त्यांनी ट्रान्सफर स्टेशनमधील एकूण कार्यप्रणालीबाबत सविस्तर माहिती घेतली.


**CHANGE IN NAME**
We have Changed Name Form
**RESHMA JAHAN AMINUDDIN KHAN**
TO
**RASHMA JAHAN**
**Passport No-J7753333**
My residential Address in Nirman Nagar,Balapur bay Pass plot no.63 care of Santosh Golden Transport Akola 444001


**CHANGE IN NAME**
We have Changed Name Form
**AMINUDDIN ANWARUDDIN KHAN**
TO
**AMEENUDDIN KHAN**
**Passport No-J7753333**
My residential Address in Nirman Nagar, Balapur bay Pass plot no .63 care of Santosh Golden Transport Akola 444001


# सहकार नगर येथे तीन दिवसीय शिवजयंती उत्सवाचे आयोजन

**अकोला–** स्थानीय गोरक्षण रोड परिसरातील सहकार नगर येथील शिवस्मारक समितीच्या वतीने सालाबाद प्रमाणे या वर्षीही तीन दिवसीय शिवजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले. सहकार नगर येथील शिव पुतळ्यासमोर आयोजित या उत्सवाचा प्रारंभ रविवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी स.८ वाजता रंगभरण स्पर्धेपासून होणार आहे. सदर स्पर्धा ही वर्ग ५ ते ७ व ८ ते १० या दोन गटात घेण्यात येणार असून यात प्रथम पारितोषिक २१०० रुपये, द्वितीय पारितोषिक १५०० रुपये तथा तृतीय पारितोषिक ११०० रुपये, प्रशस्तीपत्र, स्मृतीचिन्ह देण्यात येणार आहे. स्पर्धकांनी समितीचे आशिष चौथे यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या दिनी सकाळी ९-३० वाजता भव्य आनंदमेळा होणार आहे.यासाठी तुषार जायले यांच्याशी व अनेक रोख पुरस्कार असणाऱ्या रांगोळी स्पर्धेसाठी सौ सुवर्णा ठोसर यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या दिनी सायंकाळी ७ वाजता भव्य सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शिवजयंती दिन दि १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ६ वाजता शिवप्रतिमे समोर शिवजन्मोत्सव व सामूहिक अभिवादन सोहळा होणार आहे.स १०-३० वाजता रोख पारितोषिक असणारी वक्तृत्व स्पर्धा प्रभाकर रूमाले,सागर नारखेडे यांच्या संयोजनात होऊन सकाळी ११ वाजता वेशभूषा स्पर्धा चेतन ढोरे,डॉ मनीष सरडे यांच्या संयोजनात होणार आहे.सकाळी १२ वाजता बक्षीस व विशेष पुरस्कार वितरण कार्यक्रम होऊन रात्री आतिषबाजीने या शिवजयंती उत्सवाचे समापन होणार आहे. या सोहळ्यात समस्त शिवप्रेमी महिला पुरुष नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन शिवस्मारक समिती, सहकार नगर, गोरक्षण रोड अकोला यांनी केले आहे.

# निरामय

## थायरॉईड नियंत्रण महत्त्वाचे



**मानेच्या समोरच्या भागात असलेली लहान, फुलपाखराच्या आकाराची ग्रंथी कल्पनेपेक्षा जास्त महत्त्वाचे काम करते. थायरॉईड चयापचय क्रिया नियंत्रित करण्यास मदत करते. ही ग्रंथी वजन, ऊर्जेची पातळी आणि हृदयाच्या ठोक्यांवरदेखील प्रभाव पाडते. मेटाबॉलिक सिंड्रोमसारख्या आजारांमध्ये थायरॉईडच्या भूमिकेकडे दुर्लक्ष केले जाते.**

व्याधी विचार

मेटाबोलिक सिंड्रोम असलेल्या चारपैकी एका व्यक्तीरला हायपोथायरॉईडीझम असू शकतो. मेटाबोलिक सिंड्रोम म्हणजे आरोग्याशी संबंधित समस्यांचा समूह. त्यात अनेक प्रश्न निर्माण होतात. हृदयसंबंधित आजार, स्ट्रोक आणि टाइप २ मधुमेह. व्यक्तीला रक्तातील साखरेचे उच्च प्रमाण, कमी 'गुड' एचडीएल कोलेस्ट्रॉल, उच्च ट्रायग्लिसराइड्स, कमरेचा वाढलेला घेर आणि उच्च रक्तदाब असे तीन किंवा अधिक जोखीम घटक असल्यास मेटाबोलिक सिंड्रोम असल्याचे मानले जाते. या घटकांमुळे अखेर हृदयसंबंधित आजार, मधुमेह, स्ट्रोक आणि आरोग्याशी संबंधित इतर समस्यांचा धोका वाढतो.

**हायपोथायरॉईडीझम आणि मेटाबोलिक** सिंड्रोम यांचा अनेकदा परस्परांशी रसंबंध असतो. त्याचा रक्ताघतील साखरेचे प्रमाण, कोलेस्ट्रॉल, वजन व रक्तरदाब यांचे व्यवस्थापन करण्याच्या शरीराच्या क्षमतेवर प्रभाव पडू शकतो. हा परस्पर संबंध भारतात अधिक दिसून येतो, थायरॉईडशी संबंधित समस्या सामान्य आहेत. दहापैकी एका व्यक्तीला हायपोथायरॉईडीझम आहे. आजची धावपळीची जीवनशैली, अयोग्य पोषण, व्यायामाचा अभाव, अधिक तणाव, पुरेशी झोप न मिळणे आणि पर्यावरणीय घटक यामुळे जोखीमयुक्त स्थिती निर्माण होते. परिणामत: हायपोथायरॉईडीझम आणि मेटाबोलिक सिंड्रोम या दोन्ही समस्या उद्भवतात.

**हायपोथायरॉइडिझमवर बारकाईने लक्ष ठेवा**

थायरॉईड ग्रंथी शरीराचे कार्य सुरळीत चालवण्यासाठी पुरेसे हार्मोन्स तयार करू शकत नाही तेव्हा हायपोथायरॉईडीझम म्हणजेच अकार्यक्षम थायरॉईड स्थिती उद्भवते. या संथ गतीने होणाऱ्या प्रक्रियेचा शरीराच्या चयापचय क्रियेवर परिणाम होतो. त्यामुळे वजन, रक्तातील साखर, कोलेस्ट्रॉल आणि हृदयाच्या आरोग्यावर परिणाम होतो. थायरॉईडचे कार्य मंदावल्यामुळे रक्तारमध्ये एलडीएल कोलेस्ट्रॉल वाढू शकते. इन्सुलिनला प्रतिरोध होऊ शकतो आणि मधुमेहाचा धोका वाढू शकतो. 'हायपोथायरॉईडिझम'चे अनेकदा सुरुवातीच्या टप्प्यामध्ये निदान होत नाही. हायपोथयरॉईडिझम आणि मेटाबॉलिक सिंड्रोमची लक्षणे एकमेकांशी मिळतीजुळती असू शकतात. त्यामुळे मेटाबॉलिक सिंड्रोम किंवा संबंधित जोखीम घटक असलेल्या प्रत्येकाने नियमितपणे थायरॉईडची तपासणी करणे आवश्यक आहे.

**उपाय काय?**

* संतुलित आहार: आरोग्य उत्तम ठेवण्याच्या दिशेने पहिले पाऊल

* थायरॉईड आरोग्य उत्तम ठेवण्याफसाठी योग्य प्रमाणात पौष्टिक घटक असल्याने आहाराचे सेवन करणे महत्त्वाचे आहे. या पौष्टिक घटकांच्या खूप कमी किंवा खूप जास्त प्रमाणाचा थायरॉईडच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो. संतुलित आहाराचे सेवन करा आणि अधिक प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ, सॅच्युचरेटेड फॅट्स, सोया-आधारित उत्पादने आणि गोड पदार्थांचे सेवन कमी करा.

**उपचारामध्ये सातत्य राखा**

थायरॉईडच्या औषधांचे वेळापत्रक काटेकोरपणे पालन करा. उपचार योग्य दिशेने सुरू राहिल आणि शरीरातील हार्मोन्सचे संतुलन कायम राहिल. डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय औषध बंद करू नका किंवा औषधाच्या डोसमध्ये कोणताही बदल करू नका.

**व्यायाम करा**

दैनंदिन नित्यक्रमात जलद चालणे, सायकल चालवणे किंवा पोहणे यासारख्या सौम्य प्रमाणात व्यायामामुळे चयापचय क्रिया सक्रिय राहण्यास मदत होते. नियमितपणे शारीरिक व्यायाम केल्याने मेटाबोलिक आरोग्य उत्तम राहते आणि हायपोथायरॉईडिझमच्या लक्षणांचे व्यवस्थापन करण्यास, तसेच वजन वाढवण्यावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते.

**प्रसन्नय राहा, आरोग्यपदायी राहा**

तणावाचा मूडवर, तसेच थायरॉईडवरदेखील परिणाम होतो. तणाव वाढतो तेव्हा कॉर्टिसॉल पातळ्यांमध्येवाढ होते. त्याचा थायरॉईडच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो. आराम करणे आणि स्व त:ची काळजी घेणे याद्वारे तणावाचे व्यवस्थापन केल्यास हार्मोनल संतुलन राखण्यास मदत होते आणि थायरॉईडचे आरोग्य उत्तम राहते. हायपोथायरॉईडीझम आणि मेटाबॉलिक सिंड्रोम अनेकदा एकाच वेळी उद्भवतात आणि ते एकमेकांचे परिणाम अधिक वाढवतात. या समस्यांबद्दल अधिक जागरूकता, नियमित तपासणी आणि एकीकृत केअर यासह थायरॉईडचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करण्यास मदत होऊ शकते.

---

**जगात अनेक लोक जोडीदारासोबत राहण्यापेक्षा एकटं राहण्याला अधिक प्राधान्य देतात. एकटं राहणं कधीकधी आनंद देऊ शकते, परंतु एकटे राहणे तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. एका अभ्यासात असे आढळून आले आहे, की जीवनात जोडीदाराशिवाय राहण्यामुळे मानसिक आणि शारिरीक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो.**

संशोधन

ब्रिटनमधील केंब्रिज विद्यापीठ आणि चीनमधील फुदान विद्यापीठातील संशोधकांनी 'यूके बायोबँक' अभ्यासात ४२ हजारांहून अधिक प्रौढांच्या रक्ताच्या नमुन्यांची तपासणी केली. त्यात त्यांना आढळले, की 'सोशली क्वारंटाईन' आणि एकटेपणा हा रक्तातील वेगवेगळ्या प्रथिनांशी जोडलेला आहे. एखादी व्यक्ती सामाजिकदृष्ट्या अलिप्त राहते, तेव्हा ती सामाजिक संपर्क आणि इतर ॲक्टिव्हिटींपासून दूर राहते.

'नेचर ह्यूमन बिहेवियर'च्या एका अभ्यासातून एक आश्चर्यकारक माहिती समोर आली. एकटे राहणाऱ्या लोकांच्या प्रथिनांमध्ये लक्षणीय ओव्हरलॅप आढळून आले, तर संशोधकांनी सोशली क्वारंटाईन असलेल्या लोकांची १७५ प्रथिने आणि एकटे असलेल्या लोकांशी संबंधित २६ प्रथिने ओळखली, यापैकी ८५ टक्के प्रथिने एकमेकांशी ओव्हरलॅप होतात. ही प्रथिने जळजळ, विषाणूजन्य प्रतिक्रिया आणि मधुमेह आणि हृदयरोगांसारख्या आजारांमध्ये गुंतलेली असतात.

'रिसर्च'च्या एका अहवालात म्हटले आहे, की या लोकांमध्ये एक प्रमुख प्रथिन 'एडीएम' होते, जे ताण आणि ऑक्सिटोसिनसारख्या 'सोशल हार्मोन्स'ला नियंत्रित करते. ते 'लव हार्मोन' म्हणून आ-ळखले जाते. शरीरात 'एडीएम' ची उच्च पातळी भावनिक आणि सामाजिक प्रक्रियेसाठी जबाबदार ठरते. तसेच लहान मेंदू आणि लवकर मृत्यूच्या वाढीव जोखमीशी संबंधित ठरते. आणखी एक प्रथिन 'एएसजीएआर'१, उच्च कोलेस्ट्रॉल आणि हृदयरोगाच्या मोठ्या जोखमीशीदेखील जोडले गेले होते. इतर प्रथिन इन्सुलिन प्रतिरोध, धमन्यांचे नुकसान आणि अगदी कर्करोगाच्या प्रगतीशी जोडले गेले आहेत. तज्ज्ञांच्या मते चांगल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी सामाजिकरित्या जोडलेले राहा. विविध सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हा, कारण अशा गोष्टी एकाकीपणा कमी करण्यास आणि आरोग्य सुधारण्यास मदत करू शकतात.

## एकटे राहणे हानीकारक



---



## फॅटी लिव्हरच्या विकारांत वाढ

**भा**रतातील बदलत्या जीवनशैलीमुळे, अनेक आजार वेगाने पसरत आहेत. त्यापैकी एक म्हणजे फॅटी लिव्हर. देशातील अंदाजे ३८ टक्के प्रौढांना नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर आजाराची लागण होऊ शकते. चिंताजनक बाब म्हणजे हा आजार अनेकदा कोणत्याही स्पष्ट लक्षणांशिवाय हळूहळू वाढतो.

फॅटी लिव्हरचे निश्चित निदान अल्ट्रासाऊंड किंवा लिव्हर फंक्शन चाचण्यांद्वारे केले जाते; परंतु काही सुरुवा-तीची लक्षणे घरच्या घरीच लोकांच्या लक्षात येऊ शकतात. फॅटी लिव्हरशी संबंधित थकवा सामान्य अशक्तपणासारखा नसतो. पुरेशा विश्रांतीनंतरही शरीरात उर्जेचा अभाव निर्माण करतो. यकृत पोषक तत्वांचे उर्जेमध्ये रूपांतर करते, परंतु यकृतात चरबी जमा होऊ लागते तेव्हा ही प्रक्रिया मंदावते. परिणामी, तुम्हाला दिवसभर जड, सुस्त आणि थकवा जाणवू शकतो. लोक बरेचदा याकडे दुर्लक्ष करतात. त्यांना वाटते, की हे ताणतणाव किंवा जास्त कामाचे परिणाम आहे, परंतु जेव्हा ते रोजच घडते, तेव्हा सतर्क राहणे महत्वाचे आहे.

आरोग्य चर्चा

पोटाच्या आसपास वाढलेली चरबी

फॅटी लिव्हरचे एक प्रमुख लक्षण म्हणजे कंबर आणि पोटाभोवती वाढलेली चरबी. कधीकधी, एखादी व्यक्ती बाहेरून पातळ दिसते; परंतु त्यांची कंबर हळूहळू वाढत जाते. यकृत आणि अंतर्गत अवयवांभोवती जमा झालेली चरबी त्वचेखाली साठलेल्या चरबीपेक्षा जास्त धोकादायक असते. हे इन्सुलिन प्रतिरोध आणि खराब चयापचय आरोग्याशी जोडलेले आहे. ती फॅटी लिव्हरची प्रारंभिक चेतावणी चिन्हे मानली जातात.

उजव्या बरगड्यांखाली जडपणा किंवा सौम्य वेदना

पोटाच्या उजव्या बाजूला, बरगड्यांखाली कधीकधी जडपणा किंवा सौम्य वेदनादेखील एक लक्षण असू शकते. ही वेदना अनेकदा तीक्ष्ण नसते, परंतु दाब, घट्टपणा किंवा पूर्णता जाणवते. यकृत शरीराच्या उजव्या बाजूला असल्याने, थकवा आणि वजन वाढण्यासह अशा अस्वस्थतेला हलके घेऊ नये.

इन्सुलिन प्रतिरोधनाची सौम्य लक्षणे

फॅटी लिव्हर हे इन्सुलिन प्रतिरोधनाशी थेट संबंधित आहे. त्यात शरीराच्या पेशी इन्सुलिनला योग्य प्रतिसाद देत नाहीत. याची लक्षणे दैनंदिन जीवनात दिसून येतात. खाल्ल्यानंतर लगेचच पुन्हा भूक लागणे. अचानक ऊर्जा कमी होणे किंवा मान आणि काखेभोवतीची त्वचा काळी पडणे. ही लक्षणे बहुतेकदा मधुमेहापूर्वी दिसून येतात.

वारंवार मळमळ होणे आणि भूक न लागणे

यकृत चरबी आणि विषारी पदार्थांचे योग्यरित्या प्रक्रिया करू शकत नाही तेव्हा पचन समस्या निर्माण होऊ शकतात. सौम्य मळमळ, थोड्या प्रमाणात खाल्ल्यानंतर पोट भरल्यासारखे वाटणे किंवा भूक न लागणे, ही याची लक्षणे असू शकतात. हे यकृताच्या कमकुवत कार्यामुळे होते. कालांतराने, पचनसंस्थेचे संतुलन बिघडू लागते. ते लगेच गंभीर नसले तरी, ते एका खोल समस्येकडे निर्देश करू शकते.

---

**मू**त्रपिंडाच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. मूत्रपिंडाच्या समस्यांचे एक सुरुवातीचे आणि मूक लक्षण म्हणजे मूत्रात प्रथिने असणे, ज्याला वैद्यकीय भाषेत प्रोटीन्यूरिया म्हणतात.

सुरुवातीच्या टप्प्यात प्रोटीन्युरियाची कोणतीही स्पष्ट लक्षणे दिसत नाहीत. वेळेवर लक्षात आले नाही तर ते गंभीर आजारांना कारणीभूत ठरू शकते. पुरुष अनेकदा हे लपलेले लक्षण ओळखण्यात अपयशी ठरतात.

**मूत्रपिंड कसे कार्य करतात?**

मूत्रपिंड ही आपल्या शरीराची फिल्टर सिस्टम आहे. ते रक्तातील अशुद्धता आणि अतिरिक्त द्रवपदार्थ फिल्टर करतात आणि मूत्राद्वारे उत्सर्जित करतात. रक्तदाब नियंत्रित करण्यात, शरीरात इलेक्ट्रोलाइट संतुलन राखण्यात आणि लाल रक्तपेशी तयार करण्यातदेखील ते महत्त्वपूर्ण भूमिका बजाव-तात. निरोगी मूत्रपिंडांमधील विशेष फिल्टर (ग्लोमेरुली) प्रथिनांसारखे मोठे कण मूत्रात जाऊ नयेत, हे सुनिश्चित करतात.

**प्रोटीन्युरिया म्हणजे काय?**

हे मूत्रपिंड फिल्टर खराब होऊ लागतात तेव्हा प्रथिने मूत्रात उत्सर्जित होऊ लागतात. ही स्थिती दीर्घकाळ राहिली तर त्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. सुरुवातीला कोणतीही अस्वस्थता येत नाही, म्हणूनच याला मूक मूत्रपिंडाचा आजार देखील म्हण-तात. तथापि, नुकसान वाढत जाते तसतसे पाय आणि घोट्यांमध्ये सूज येणे, थकवा, फेसयुक्त मूत्र आणि रात्री वारंवार लघवी होणे यासारख्या समस्या दिसू लागतात.

आरोग्यमंत्र



## मूत्रपिंडाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष नको

**पुरुषांना जास्त त्रास का होतो?**

पुरुषांना कमी वयात उच्च रक्तदाब होण्याची शक्यता जास्त असते. ते मूत्रपिंडाच्या नुकसानाचे एक प्रमुख कारण आहे. याव्यतिरिक्त, पुरुषांना टाइप २ मधुमेहाचा धोका जास्त असतो. तो कालांतराने मूत्रपिंडांना नुकसान पोहोचवू शकतो. वृद्धापकाळात प्रोस्टेट वाढल्याने मूत्रमार्गात अडथळा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे मूत्रपिंडांवर दबाव येतो. धूम्रपान, जास्त मद्यपान, प्रक्रिया केलेले अन्न आणि लाल मांसाचे जास्त सेवन यासारख्या जीवनशैलीच्या सवयी देखील मूत्रपिंडांसाठी हानिकारक ठरतात. लक्षणांकडे दुर्लक्ष केल्याने निदान आणि उपचारांना विलंब होऊ शकतो.

**निदान कसे करावे?**

कोणत्याही जटिल चाचण्यांची आवश्यकता नाही. साध्या लघवीच्या चाचणीद्वारे लघवीतील प्रथिने शोधता येतात. प्रथिने आढळली तर डॉक्टर मूत्रातील प्रथिने-क्रिएटिनिन प्रमाण, २४ तास लघवीची चाचणी आणि रक्त चाचण्या यासारख्या पुढील चाचण्यांद्वारे मूत्रपिंडाच्या स्थितीचे मूल्यांकन करतात.

**मूत्रपिंड निरोगी ठेवण्याचे सोपे मार्ग**

रक्तदाब आणि रक्तातील साखर नियंत्रित ठेवणे मूत्रपिंडाच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. या समस्या असतील, तर तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि औषधे, योग्य आहार आणि नियमित व्यायाम करा. वजन नियंत्रणात ठेवा, कारण लठ्ठपणामुळे उच्च रक्तदाब आणि मधुमेहाचा धोका वाढतो. दैनंदिन आहारात प्रक्रिया केलेले अन्न, जास्त लाल मांस आणि साखरेचे पेये कमी करा आणि फळे, भाज्या, संपूर्ण धान्य आणि पातळ प्रथिने समाविष्ट करा. तसेच, नियमित आरोग्य तपासणीचे वेळापत्रक तयार करा.

---

## डोकेदुखीमुळे हृदयविकाराला निमंत्रण


**डो**के जड वाटत असेल तर त्याला मानसिक थकवा म्हणून नाकारणे चांगले नाही. ही लक्षणे बहुतेकदा हृदयरोग दर्शवतात. हृदयरोग नेहमीच छातीत दुखणे किंवा श्वास घेण्यास त्रास होणे यासारख्या सामान्य लक्षणांद्वारे प्रकट होतो, असे नाही. मेंदूची लक्षणे हृदयाच्या समस्या दर्शवतात. अनेक डॉक्टर रुग्णांना स्मृती कमी होणे किंवा मेंदूतील धुके असल्याची तक्रार करताना दिसतात, परंतु त्यांना अनेकदा मूळ कारण हृदयाच्या समस्येचे आहे हे कळत नाही.

व्याधी विकार

मेंदूचे आरोग्य थेट हृदयाच्या आरोग्याशी संबंधित आहे. मेंदूतील धुके हे हृदयाचे लक्षणदेखील असू शकते. हृदय मेंदूला पुरेसा ऑक्सिजन पुरवू शकत नाही. तेव्हा त्याच्या विचार करण्याच्या क्षमतेवर थेट परिणाम होतो. अनेक अभ्यासातून असे दिसून आले आहे, की हृदयाच्या कार्यात थोडीशी घटदेखील मेंदूतील रक्ताभिसरण कमी करू शकते. याचा स्मरणशक्ती, लक्ष केंद्रित करणे आणि संज्ञानात्मक कार्यावर परिणाम होतो. 'जर्नल ऑफ सेरेब्रल ब्लड फ्लो अँड मेटाबोलिझम'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासातून असे दिसून आले आहे, की सौम्य हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी बिघाड मेंदूच्या कार्यावर परिणाम करू शकतो.

**सुरुवातीची लक्षणे ओळखणे का महत्त्वाचे आहे?**

मेंदूतील धुके किंवा स्मरणशक्ती कमी होणे हे केवळ वय किंवा ताणतणावामुळे होत नाही. कार्यात्मक औषधाचे ध्येय म्हणजे शरीरातील लहान लक्षणे गंभीर आजार होण्यापूर्वी ओळखणे. या लक्षणांकडे वेळीच लक्ष दिले, तर हृदयाशी संबंधित गंभीर समस्या वाढण्यापासून रोखता येतात.





---

## ओव्याने दूर करा तोंडाच्या समस्या

दंतारोग्य

हिरड्या सुजणं, तोंडाची दुर्गंधी या मौखिक आरोग्याशी संबंधित सर्वसाधारण समस्या आहेत. तोंड स्वच्छ ठेवलं नाही तर दातांमध्ये साठलेलं अन्न कुजून दुर्गंध येऊ लागतो. ही समस्या दूर करण्यासाठी बरेच उपाय केले जातात. ओव्याच्या पाण्याने तोंडाची दुर्गंधी दूर होऊ शकते. यासाठी थोड्या पाण्यात ओवा घालून उकळून घ्या. या पाण्याने चूळ भरल्यामुळे तोंडाच्या दुर्गंधीची समस्या कमी होऊ शकते. हिरड्यांमधून रक्त येत असेल तर ओव्याच्या तेलाचे काही थेंब गरम पाण्यात घालून या पाण्याने चूळ भरल्यामुळे हिरड्यांमधलं रक्त थांबू शकतं. पण कोणतीही समस्या असली तरी दंततज्ज्ञाचा सल्ला घ्यायला विसरू नका.



## त्वचेवर दिसतात परिणाम

जपणूक त्वचेची

शरीरात एखाद्या पोषक घटकाची कमतरता असल्यास त्याची लक्षणं दिसू लागतात. त्वचा पांढरी पडणं, त्वचेवर चट्टे पडणं, पिंपल्स येणं ही एखाद्या पोषक घटकाच्या कमतरतेची लक्षणं असू शकतात. त्वचा निस्तेज, पांढरट दिसणं हे बी १२ या जीवनसत्त्वाच्या कमतरतेचं लक्षण असू शकतं. त्वचेवर पुरळ किंवा पिंपल्स येत असतील तर हे 'अ' आणि 'ई' या जीवनसत्त्वांच्या कमतरतेचं लक्षण ठरू शकतं. त्यामुळे त्वचेच्या समस्या असतील तर या जीवनसत्त्वांच्या कमतरतेची तपासणी नक्की करून घ्या.



## नैराश्यावर प्रभावी उपाय

आजीबाईचा बटवा

सध्या अनेकांना नैराश्याने ग्रासल्याचं पहायला मिळतं. नैराश्याच्या या समस्येवर बरेच उपचार करावे लागतात. पण काही घरगुती उपायांनी तुम्हाला बरं वाटू शकतं. हळद आणि लिंबाच्या मिश्रणामुळे नैराश्य तसंच इतर मानसिक आजारांमध्ये बरं वाटू शकतं. यासाठी एका भांड्यात चार कप पाणी घ्या. त्यात एका लिंबाचा रस घाला. यात दोन चमचे हळद आणि चार चमचे मध घाला. हे सर्व घटक नीट मिसळून घ्या. दिवसातून दोन वेळा हे पाणी प्या. यामुळे लाभ होतील. हळदीतल्या पोषक घटकांमुळे नैराश्याची तीव्रता कमी होऊ शकते.



---

## मधुमेहींसाठी ब्रेडचे पर्याय

**श्री** मधुमेहींच्या खाण्यापिण्यावर बरीच बंधनं येतात. कर्बोदकांचं अधिक प्रमाण असणारे, अधिक कॅलरीचे गोड पदार्थ त्यांना खाता येत नाहीत. अधिक कर्बोदकं असणाऱ्या पदार्थांमध्ये ब्रेडचाही समावेश होतो. मधुमेहींनाही ब्रेड खायला मनाई केली जाते. मात्र ब्रेड खायची वेळ आलीच किंवा एखाद्या वेळी ब्रेड खावासा वाटला तर कोणत्या ब्रेडची निवड करावी, याविषयी...

काय खावं?

- ब्रेड घेण्याआधी त्यातल्या पोषणमूल्यांबाबत जाणून घेणं गरजेचं आहे. त्यामुळे पाकिटातल्या पोषणमूल्यांची माहिती वाचून मगच ब्रेड खरेदी करा.
- अमेरिकन डायबेटिक असोसिएशनच्या म्हणण्यानुसार मधुमेहींनी पूर्ण धान्याचा किंवा गव्हाचा ब्रेड खावा. मैद्याचा पांढरा ब्रेड शक्यतो टाळावा.
- ओट्स, जवस आणि गव्हाचा पीटा ब्रेड मिळतो. या ब्रेडमध्ये फायबरचं प्रमाण बरंच जास्त असतं. यात कर्बोदकंही कमी प्रमाणात असतात. या ब्रेडची चवही चांगली असते. या ब्रेडमुळे तुमची कर्बोदकं खाण्याची इच्छा कमी होऊ शकते.



- फायबरयुक्त गव्हाचा ब्रेडही मधुमेहींसाठी चांगला पर्याय आहे. पण तुम्ही दर्जेदार गव्हाचा ब्रेड घ्या. या ब्रेडमुळे पोट बराच काळ भरलेलं रहातं. यामुळे वजन कमी करण्याची प्रक्रियाही सुलभ होते.
- मधुमेहींसाठी मल्टीग्रेन ब्रेडचा पर्यायही उपलब्धआहे. मल्टीग्रेन ब्रेडमधल्या फायबरमुळे पोट बराच काळ भरलेलं रहातं. चांगल्या कंपनीचा मल्टीग्रेन ब्रेड रक्तातलं साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेऊ शकतो.
- ग्लुटन फ्री ब्रेड आंधळेपणाने विकत घेऊ नका. कारण ग्लुटन फ्री ब्रेडमध्ये कर्बोदकांचं प्रमाण बरंच अधिक असू शकतं. ग्लुटनची ॲलर्जी असेल तरच ग्लुटन फ्री ब्रेड खरेदी करा.

# आपली बसचे कर्मचारीही संपात सहभागी होणार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :
दहा केन्द्रीय कामगार संघटना व ४४ औद्योगिक फेडरेशनच्या निर्णयानुसार १२ फेब्रुवारी रोजी अखिल भारतीय एक दिवसीय संपाचे आवाहन करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या कामगार विरोधी व शेतकरी विरोधी निर्णयाच्या निषेधार्थ हा संप करण्यात येणार आहे.

या संपात नागपूर मनपा अंतर्गत सेवा देणाऱ्या आपली बसचे कर्मचारी सहभागी होणार असल्याची माहिती आहे. परिणामी, गुरूवार १२ फेब्रुवारी रोजी पुन्हा शहर बस वाहतूक प्रभावित होण्याचे संकेत आहेत.

बिहार निवडणुकीनंतर केंद्र सरकारने हे चार श्रम कोड बिल लागू करण्याचा निर्णय घेतला. चार श्रम कोड बिल हे कार्पोरेट धार्जिणे असून कामगारांना कोणतेही संरक्षण मिळत नाही. तसेच कामगारांना आधी जे थोडे फार संरक्षण जुन्या कामगार कायद्यांमुळे प्राप्त होते तेही या श्रम कोडनी काढून टाकलेले आहे व रोजगार सुरक्षा हा प्रश्नच मोडीत काढला आहे.

यामुळे कामगार न्यायालय, कामगार ट्रायब्युनल, कामगार कार्यालय वगैरे सारे अधिकार मोडीत निघणार आहे व कामगारांचे शोषण करण्यास मालक वर्गास मोकळीक देण्यात आल्याचे कामगार संघटनांचे म्हणणे आहे.

दरम्यान, या कायद्याच्या विरोधात सीटूच्या नेतृत्वात खंडोबा मंदिर पासून सकाळी ११ वाजता शनीचरा कॉटन मार्केट, नागपूर येथून मोर्चा निघून संविधान चौकात धडकेल. या मोर्चात हजारोंच्या संख्येने आंदोलक सहभागी होणार असल्याचे दिलीप देशपांडे यांनी सांगितले.

वैद्यकीय व विक्री प्रतिनिधीचे फेडरेशन हे या अखिल भारतिय मंचामध्ये सामील आहे वैद्यकीय व विक्री प्रतिनिधींना लागू असलेल्या विक्री संवर्धन कर्मचारी सेवा व शर्ती अधिनियम हा कायदा नवीन श्रम कोड बिलातून वगळण्यात आलेला आहे. चार श्रम कोड बिल रद्द करा या मागणीसह इतर मागण्यांकरीता वैद्यकीय व विक्री प्रतिनिधी या संपामध्ये सामील होत असल्याचे एमएसएमआरएचे सचिव नितिन ढोबळे यांनी सांगितले.

चार श्रम कोड बिल रद्द करावे, सेल्स प्रमोशन एम्पलॉईज ॲक्ट सेवा शर्ती पुर्नजिवित करून वैद्यकीय प्रतिनिधीच्या सर्वसामान्य कामकाजाचे वैधानिक नियम तयार करावे, आठ तासाचे कामासाठी ३०,००० रुपये किमान वेतन व १०,००० रुपये मासिक पेन्शन लागू करावे, ईएसआय, पीएफ, ग्रॅच्युईटी, बोनस, वर्कमन कम्पनसेशन ॲक्ट मधील वेतन मर्यादा यावरील सिलीग रद्द करावे, सरकारी रूग्णालय व आरोग्य व्यवस्थापनामध्ये वैद्यकीय प्रतिनिधीच्या प्रमोशनसाठी बंदी करणारा केंद्रीय सार्वजनिक आरोग्य खात्याचा जीआर करा व वैद्यकीय प्रतिनिधीच्या घटनादत्त रोजगार अधिकाराचे संरक्षण करावे, औषध विकी उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वैद्यकीय प्रतिनिधीचा मानसिक छळ करणे थांबवून त्यासाठी नोकरीतून बडतर्फ करणे बंद करावे, इलेक्ट्रॉनिक गॅझेट व्दारा ट्रॅकिंग व सर्व्हीलन्स करुन वैयक्तिक गोपनियता व खाजगीपणावर अतिक्रमण बंद करावे, अशा अनेक मागण्यांच्या समर्थनार्थ आयोजित या संपात विविध आस्थापनातील कामगारांनी सहभागी होण्याचे आवाहन संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### काँग्रेसचा हात सोडून मशालची कमळाला साथ....

# ठाकरे, राऊतांचे आदेश धुडकावले?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर / चंद्रपूर, दि. १० :
चंद्रपूर महानगरपालिकेतील गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या सत्तानाट्याचा मंगळवारी अत्यंत नाट्यमय शेवट झाला.

कोणत्याही परिस्थितीत भाजपला सत्तेपासून दूर ठेवा, असा आदेश शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिल्याची चर्चा सकाळी सुरू असतानाच, दुपारी मात्र ठाकरे गटाने चक्क भाजपशी हातमिळवणी करत सर्वांनाच धक्का दिला. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांच्यासोबत झालेल्या बैठकीत फिस्कटलेले गणित आणि भाजपने दिलेली महापौरपदाची 'ऑफर' यामुळे चंद्रपुरात नवे राजकीय समीकरण आकारास आले आहे.

आज सकाळी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे यांची बैठक झाली. या बैठकीत ठाकरे गटाने महापौरपदाची मागणी केली होती, मात्र वडेट्टीवार पाच वर्षांच्या कार्यकाळात एकदाही महापौरपद देण्यास तयार नव्हते. यामुळे संतापलेले संदीप गिऱ्हे बैठकीतून तडकाफडकी बाहेर पडले. त्यानंतर काही वेळातच भाजपचे स्थानिक नेते किशोर जोरगेवार यांनी ठाकरेंच्या शिवसेनेने भाजपला पाठिंबा दिल्याची अधिकृत घोषणा केली.

**सत्तेचा नवा फॉर्म्युला**

भाजप आणि ठाकरे गटामध्ये सत्तेच्या वाटणीचा 'सव्वा-सव्वा' वर्षांचा फॉर्म्युला निश्चित झाला आहे. पहिली सव्वा वर्षे भाजपकडे, त्यानंतरची सव्वा वर्षे ठाकरे गटाकडे असेल (प्रत्येकी दोन टर्म). ठाकरे गटाचे प्रशांत दानव हे पाच वर्षे उपमहापौर राहतील. पहिल्या आणि चौथ्या वर्षाचे सभापतीपद ठाकरे गटाला देण्यात आले आहे.

**आ. जोरगेवारांची भूमिका**

चंद्रपूर मनपात ६६ जागांपैकी काँग्रेसकडे २७ जागांचे बलाबल असूनही त्यांना सत्तेपासून दूर राहावे लागले. भाजपकडे २३ आणि ठाकरे गटाकडे ६ जागा आहेत.

जोरगेवार म्हणाले की, आमच्या नेत्यांची महापौरपद सोडण्याची इच्छा नव्हती, पण शहराच्या विकासासाठी आणि स्थिर सत्तेसाठी आम्ही ठाकरे गटाची मागणी मान्य केली.

**संदीप गिऱ्हे काँग्रेसवर नाराज?**

आम्ही विकासासाठी भाजपसोबत गेलो आहोत, असे स्पष्टीकरण संदीप गिऱ्हे यांनी दिले. विजय वडेट्टीवार आम्हाला कुठेही महापौरपद द्यायला तयार नव्हते. याउलट किशोर जोरगेवार आणि सुधीर मुनगंटीवार आमच्या संपर्कात होते आणि त्यांनी सन्मानजनक वाटा दिला, असेही त्यांनी नमूद केले.

**विजय वडेट्टीवार यांची भूमिका**

ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख संदीप गिऱ्हे हे विजय वडेट्टीवार यांच्यासोबतच्या बैठकीतून बाहेर पडल्यानंतर विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. आमच्याकडे ३१ नगरसेवक आहेत. उद्धवसेनेला आम्ही स्थायी समिती अध्यक्ष पदाची ऑफर दिली. गरज पडली तर त्यांना उपमहापौर पद देऊ. त्यांना महापौर पद पाहिजे अशी त्यांची भूमिका आहे आणि त्यावर आमची चर्चा सुरू आहे. नाही झाले तर विरोधी पक्षात बसू, असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

दरम्यान आज सकाळीच संजय राऊत यांनी माध्यमांशी बोलताना भाजपला मदत होणार नाही अशी भूमिका उद्धव ठाकरेंनी घेतली आहे असे सांगितले होते, मात्र काही तासांतच स्थानिक नेत्यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

दुसरीकडे, काँग्रेस नेत विजय वडेट्टीवार आणि खासदार धानोरकर यांच्यातील वाद, पुढे काँग्रेसचा अट्टहास त्यांना सत्तेपासून दूर घेवून गेला .

## उप्पलवाडी एमआयडीसीतील पेपर मिलमध्ये अग्नितांडव

### अनेक बॉयलर सिलेंडरचा स्फोट



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :
नागपूरच्या उप्पलवाडी एमआयडीसी परिसरात असलेल्या एका पेपर मिलमध्ये अचानक भीषण स्फोटांची मालिका घडली.

प्राथमिक माहितीनुसार, मिलमध्ये कार्यरत असलेले १० ते १२ बॉयलर सिलेंडर एकामागोमाग एक फुटले. या स्फोटांमुळे संपूर्ण परिसर हादरून गेला असून आवाज दूरवरपर्यंत ऐकू आले.

घटनेनंतर परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस आणि प्रशासनाच्या पथकांनी घटनास्थळी तातडीने धाव घेतली. सुरक्षेच्या कारणास्तव परिसर सील करण्यात आला असून मिलमधील कामगारांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे.

दरम्यान, स्फोटाचे नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. बॉयलरमधील तांत्रिक बिघाड किंवा दाब वाढल्यामुळे स्फोट झाल्याची प्राथमिक शक्यता वर्तवली जात आहे. प्रशासनाकडून घटनेचा सखोल तपास सुरू असून नुकसान व संभाव्य जीवितहानीबाबत अधिकृत माहितीची प्रतीक्षा आहे.

## आयकॉनिक पूनम टॉवर अखेर पाडणार

### एन. कुमार यांचे हायकोर्टात स्पष्ट आश्वासन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १० :
नागपूरातील विधिमंडळ भवनासमोर असलेल्या आयकॉनिक पूनम टॉवरबाबत मोठी आणि निर्णायक घडामोड समोर आली आहे. टॉवरचे मालक एन. कुमार उच्च न्यायालयात प्रत्यक्ष हजर झाले आणि २ महिन्यांच्या आत संपूर्ण पूनम टॉवर पाडून काढण्याचे ठोस आश्वासन त्यांनी न्यायालयाला दिले आहे.

न्यायालयाला माहिती देताना एन. कुमार यांनी येणाऱ्या १ आठवड्यात पाडकामाची प्रक्रिया सुरू केली जाईल, असे स्पष्ट केले. त्यांच्या वैयक्तिक उपस्थितीची आणि दिलेल्या वेळापत्रकाची नोंद न्यायालयाने घेतली असून, यापुढे या प्रकरणात आश्वासनांची अंमलबजावणी काटेकोरपणे तपासली जाण्याची शक्यता आहे.

विधानभवनाच्या सुरक्षेच्या दृष्टीने पूनम टॉवर पाडण्याची मागणी करत याचिका दाखल करण्यात आली होती. सुरुवातीला या पाडकामाला विरोध करणारे एन. कुमार अखेर न्यायालयासमोर नरमले असून, टॉवर पाडण्यावर अधिकृत शिक्कामोर्तब झाले आहे.

दरम्यान, पाडकामाची अचूक कार्यपद्धती, सुरक्षाव्यवस्था, मलबा विल्हेवाट, वाहतूक व्यवस्थापन, पर्यावरणीय बाबी आणि महापालिकेसह इतर यंत्रणांशी समन्वय यासंदभार्तील सविस्तर आराखडा अद्याप सादर झालेला नाही.

पाडकामाच्या प्रगतीचा अहवाल पुढील सुनावणीवेळी सादर केला जाण्याची शक्यता असून, नागपूरच्या मध्यवर्ती भागातील या मोठ्या कारवाईकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## पत्नीचा गळा चिरणाऱ्या पतीला जन्मठेप

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १० :
पोटच्या गोळ्याला दूध पाजणाऱ्या पत्नीचा केवळ संशयावरून कुऱ्हाडीने गळा चिरणाऱ्या पतीला यवतमाळ जिल्हा व सत्र न्यायालयाने सोमवारी जन्मठेपेची कठोर शिक्षा सुनावली. विनोद कानबाले (३५) असे आरोपीचे नाव आहे.

ही घटना १२ एप्रिल २०१७ रोजी नेर तालुक्यात घडली होती. पिंपळगाव काळे येथील रहिवासी विनोद कानबाले हा आपल्या पत्नीवर नेहमी संशय घ्यायचा. घटनेच्या दिवशी त्याची पत्नी वनिता कानबाले ही चिमुकली मुलगी श्रावणी हिला दूध पाजत होती. घरामध्ये कौटुंबिक वातावरण असताना विनोदच्या मनात संशयाची पाल चुकचुकली. रागाच्या भरात विवेक हरवलेल्या विनोदने कुऱ्हाड उचलली आणि वनिताच्या मानेवर सपासप वार केले. हा भयानक प्रकार पाहून त्याची आई सुनीता कानबाले धावून आली. विनोदने स्वतःच्या जन्मदात्रीवरही वार केला. या हल्ल्यात सुनीता यांना गंभीर जखम झाली, तर वनिताचा जागीच तडफडून मृत्यू झाला.

या प्रकरणात न्यायालयाने पाच साक्षीदार तपासले. या प्रकरणात सर्वात महत्त्वाचा दुवा ठरली ती आरोपीची आई आणि प्रत्यक्षदर्शी असलेली मुलगी. स्वतःच्या डोळ्यासमोर आईची हत्या होताना पाहणाऱ्या मुलीची आणि मुलाच्या क्रूरतेचा बळी ठरलेल्या आईची साक्ष न्यायालयाने अत्यंत महत्त्वाची मानली.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि परिस्थितीजन्य पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने विनोद कानबालेला दोषी ठरवले. न्यायालयाने आरोपीला खुनाच्या आरोपात कलम ३०२ मध्ये जन्मठेप आणि ५०० रुपये दंड तर पत्नीस मारहाण प्रकरणी सहा महिने सक्तमजुरी आणि २०० रुपये दंड ठोठावला. सरकारी पक्षातर्फे सहायक सरकारी वकील ॲड. मंगेश एस. गंगलवार यांनी काम पाहिले, तर पोलीस पैरवी अधिकारी म्हणून महेंद्र भोवते यांनी याकामी सहकार्य केले.

## लोकमानस

## बांबूपासून मूर्ती साकारणारा आदिवासी अवलिया कलाकार



तलासरी तालुक्यातील उधवा कुंभारपाडा येथील मधुकर चंद्रया दळवी हा आदिवासी युवक बांबूच्या लाकडाला विविध आकार आणि रंगसंगतीच्या मिलाफातून वारली कलाप्रकारात विविध वस्तू साकारतो. त्या वारली चित्रकला आणि स्थानिक संस्कृतीचे दर्शन घडविणा?या आहेत. शासनाने आर्थिक पाठबळ आणि बाजारपेठ उपलब्ध केल्यास पाड्यावरच्या कलादालनातील उद्योनमुख कलाकारांना नाव व आर्थिक पाठबळ मिळेल.

पालघर जिल्ह्याच्या विविध तालुक्यात अनेक आदिवासी कलाकारांनी वारली चित्रकला डोळ्यासमोर ठेवून विविध कला प्रकारात ठसा उमटवला आहे. मात्र अंगभूत कलागुण असूनही वेळ, पैसा आणि व्यासपीठ नसल्याने अनेक कलाकार काळाच्या पडद्याआड गेले. तलासरी या दुर्गम आदिवासी तालुक्यातील उधवा कुंभारपाडा येथील मधुकर चंद्रया दळवी या आदिवासी युवकाचे दहावी पर्यंत शिक्षण झाले आहे.

तो उधवा आश्रम शाळेत सुरक्षारक्षक असून फावल्या वेळेत त्याने बांबूच्या लाकडांना विविध आकार देत, त्यावर कलाकुसर आणि रंगरंगोटी करून सुबक वस्तू बनविल्या आहेत.

आदिवासी समाजातील असल्याने वारली संस्कृती, त्यातील विविध घटना, प्रसंग, वाद्ये, प्रेरणास्थाने, व्यक्तिमत्व इ. घटकांना कलेतून मूर्तरूप दिले आहे. या संस्कृतीची ओळख सर्वांना व्हावी व कलेचा प्रचार-प्रसार व्हावा हा त्यामागचा त्याचा उद्देश आहे. आदिवासी संस्कृतीतील तारपा, ढोल वादक, काम करण्याऱ्या स्त्रीया-पुरुष, स्थानिक संस्कृतीतील चालीरीती इ. त्याच्या कलेतील मुख्य घटक आहेत.

या वस्तूंना त्यांनी थ्रीडी स्वरुपात अभिव्यक्त केल्या आहेत. स्थानिक परिसरात उपलब्ध बांबू आणि धारदार विळा, सुरी आदी साहित्याचा वापर करून घरातील एका खोलीत या वस्तू बनवतो. आज या खोलीला कलादालनाचे रूप आले असून त्याची कला पाहण्यासाठी अनेकजण भेट देतात. काही वस्तू नंदुरबार येथील संग्रहालयात पाठवल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील आदिवासी कलाकारांनी बनविलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास अंगभूत कलेचा विकास व त्यांची आर्थिक सक्षमता वाढेल. ही कुडाच्या खोलीतील कलादालने पर्यटन व्यवसायाची जोडल्यास वारली संस्कृतीचा प्रसार होऊन हे कलाकार नावारूपाला येतील अशी भावना शिक्षक विनेश धोडी यांनी व्यक्त केली. ■ ■ ■

## असा लागला शोध छत्रीचा

पावसाळ्याला चांगलीच सुरुवात झाली आहे. अशातच पावसाळा सुरु होताच सर्वसामान्यांपासून ते अगदी श्रीमंतांपर्यंत लोकांना हमखास आठवणारी एक गोष्ट असते ती म्हणजे छत्री. एरव्ही कुठेतरी अडगळीच्या खोलीत धूळ खात असलेली छत्री पावसाळ्यात मात्र फार महत्त्वाची वाटते. कुठेही बाहेर जाताना छत्री हातात लागतेच. पण, पावसाळ्यात सर्वात जवळची वाटणाऱ्या छत्रीचा इतिहास तुम्हाला माहित आहे का? नसेल तर ही माहिती तुमच्यासाठी...




छत्रीचा शोध हा साधारणपणे ४ हजार वर्षांपूर्वी लागला. सुरुवातीला छत्री इजिप्त, अश्शूर, ग्रीस आणि चीन यांसारख्या देशांत वापरली जाऊ लागली. खरंतर, सुरुवातीला छत्रीचा उपयोग उन्हापासून संरक्षण करण्यासाठी केला जात होता. त्यानंतर कालांतराने छत्री पावसाळ्यात वापरू जाऊ लागली. 'Umbrellaa' म्हणून प्रचलित असलेल्या छत्रीचा मूळ शब्द लॅटिन भाषेत सापडतो. लॅटिन भाषेत छत्रीला 'वे१' म्हणून ओळखले जायचे. वे१ याचा अर्थ सावली असा आहे. युरोपमध्ये 16व्या शतकापासून छत्र्या या स्त्रीलिंगी वस्तू म्हणून वापरल्या जात होत्या. त्यानंतर पर्शियन प्रवासी आणि लेखक जोनास हॅनवे यांनी इंग्लंडमध्ये ३० वर्ष सार्वजनिकपणे छत्री वापरली तेव्हा ही प्रथा बदलली आणि पुरुष लोकसुद्धा छत्रीचा वापर करू लागले. सध्या बाजारत आपल्याला अनेक प्रकारच्या छत्र्या पाहायला मिळतात. ■ ■ ■

## सुझुकी मोटरसायकलचा डेहराडूनमध्ये विस्तार



सुझुकी मोटर कॉर्पोरेशन, जपानची दुचाकी उपकंपनी असलेल्या सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड)ने डेहराडूनमध्ये आपल्या नवीन डीलरशिप, कनक सुझुकीचे उद्घाटन केले, ज्यामुळे उत्तराखंडमधील आपली उपस्थिती आणखी मजबूत झाली आहे.

या नवीन डीलरशिपचे उद्घाटन दीपक मुतरेजा, (उपाध्यक्ष, विक्री आणि विपणन, सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) यांच्या हस्ते, SMIPL आणि कनक सुझुकीचे वरिष्ठ अधिकारी आणि ग्राहकांच्या उपस्थितीत करण्यात आले.

मेन रायपूर रोड, डेहराडून येथे स्थित, कनक सुझुकीची रचना ग्राहकांना एकाच छताखाली अखंड 3S (विक्री, सेवा आणि सुटे भाग) समाधान प्रदान करण्यासाठी करण्यात आली आहे. हे नवीन आउटलेट सुझुकीच्या विस्तारत असलेल्या रिटेल नेटवर्कमध्ये ग्राहकांना सोयीस्कर आणि प्रीमियम अनुभव देण्यावर असलेल्या कंपनीच्या ध्येयाचे प्रतिबिंब आहे. नवीन व्यावसायिक भागीदाराचे सुझुकी कुटुंबात स्वागत करताना, दीपक मुत्रेजा म्हणाले, डेहराडूनमधील कनक सुझुकीमुळे आम्ही आमच्या ग्राहकांच्या अधिक जवळ आलो आहोत, ज्यामुळे त्यांना आमच्या स्कूटर, मोटरसायकल आणि विक्रीपश्चात सेवांच्या संपूर्ण श्रेणीमध्ये सहज प्रवेश मिळेल.

या नवीन समावेशामुळे, आता डेहराडूनमध्ये आमच्या चार अधिकृत डीलरशिप झाल्या आहेत, ज्यामुळे उत्तराखंडमधील आमचे एकूण टचपॉइंट्स १५ झाले आहेत आणि आम्हाला संपूर्ण राज्यातील रायडिंग उत्साही लोकांशी अधिक प्रभावीपणे जोडले जाण्यास मदत होईल. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## एसटी कर्मचाऱ्यांकडून पुन्हा तीव्र आंदोलनाचा इशारा

### ११६.६९ कोटींची रक्कम थकीत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :
राज्यातील एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य सरकारकडून आलेल्या रकमेबरोबर वाढीव वेतनाचा फरक देण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, संबंधित रक्कम न दिल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

मंगळवार १० फेब्रुवारीपर्यंत वाढीव वेतनाचा फरक न दिल्यास रीतसर नोटीस देऊन तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अजय हट्टेवार यांनी दिला आहे.

एकीकडे महामंडळावर सुमारे ४२०० कोटींची वैधानिक देणी थकीत असताना दुसरीकडे कर्मचाऱ्यांना वाढीव वेतनाचा हप्ता न देणे ही सरळ अवहेलना असल्याचे हट्टेवार यांनी स्पष्ट केले. मंगळवार, १० फेब्रुवारीपर्यंत वाढीव वेतन फरकाची रक्कम न मिळाल्यास रीतसर नोटीस देऊन एसटी कर्मचारी तीव्र स्वरूपाचे आंदोलन करतील, असा इशारा देत परिवहनमंत्री यांना भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करून कामगार वर्गात रोष असल्याचे कळवले.

दुसरीकडे, परिवहनमंत्री प्रताप सरदेसाई यांनी हा विषय लवकरच निकाली काढू, असे आश्वासन पदाधिकाऱ्यांना दिले आहे.

## विधिमंडळाचे अधिवेशन २३ फेब्रुवारीपासून

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १० :
महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे सविस्तर वेळापत्रक आज निश्चित करण्यात आले असून, सोमवार २३ फेब्रुवारी २०२६ पासून मुंबईत सत्तेचा आणि संघर्षाचा नवा अंक सुरू होणार आहे.

कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, राज्याचा अर्थसंकल्प ६ मार्च २०२६ रोजी मांडला जाणार आहे. या अधिवेशनात केवळ आर्थिक आकडेवारीच नाही, तर अनेक सामाजिक विषयांवरही खलबते होणार असल्याने राजकीय वतुर्ळात मोठी उत्कंठा निर्माण झाली आहे.

या बैठकीची सुरुवात राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहून करण्यात आली. त्यांच्या अचानक जाण्याने रिक्त झालेल्या जागेवर आता नवीन अर्थसंकल्प कसा असेल, याबाबत उत्सुकता आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दोन्ही सभागृहात त्यांच्या सन्मानार्थ शोकप्रस्ताव मांडला जाईल. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह विविध पक्षांचे दिग्गज नेते उपस्थित होते.

संयुक्त राष्ट्र संघाने २०२६ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून घोषित केल्याने, या अधिवेशनात महिला शेतक?यांच्या प्रश्नांवर विशेष चर्चा केली जाणार आहे. ९ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त दोन्ही सभागृहात महिला सक्षमीकरणाचा जागर होईल. यासोबतच मराठी भाषा गौरव दिन आणि निवृत्त होणाऱ्या सदस्यांचा निरोप समारंभ असे महत्त्वाचे टप्पे या २५ मार्चपर्यंत चालणाऱ्या अधिवेशनात पार पडतील.

**सुट्ट्या आणि जादा कामकाजाचे नियोजन**

यंदाच्या अधिवेशनात सुट्ट्यांचे नियोजनही चोख करण्यात आले आहे. २ मार्चला होळी आणि ३ मार्चला धूलिवंदन असल्याने कामकाज बंद राहील. तसेच १९ मार्चला गुढीपाडव्यानिमित्त सार्वजनिक सुट्टी असेल. मात्र, शनिवार २८ फेब्रुवारी रोजी शासकीय सुट्टी असतानाही राज्याच्या हितासाठी विधिमंडळाचे कामकाज सुरू ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे.

राज्याच्या विकासाची दिशा ठरणारे हे अधिवेशन सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्षाने किती गाजते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## एलपीजी सिलेंडरचा काळाबाजार, १८० सिलेंडर जप्त



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १० :
शहर हद्दीतील खडका शेत शिवारात अनुदानीत घरगुती वापराच्या सिलेंडरची साठेबाजी करणाऱ्या गोदामावर छापा टाकत पोलिसांनी गोरखधंदा चव्हाट्यावर आणला. या गोदामातून पोलिसांनी घरगुती वापराचे अनुदानित १८० सिलेंडर जप्त करत साठेबाजी करणाऱ्या पाच जणांच्या टोळीला जेरबंद केले.

गुन्हे शाखेच्या पथक एकने हिंगणा पोलीस हद्दीतील खडका येथील गोदामावर सोमवारी हा छापा टाकला. या गोदामातून घरगुती वापराच्या अनुदानीत गॅस सिलेंडरमधून वायू काढून घेत तो व्यावसायिक वापराच्या सिलेंडरमध्ये भरला जात होता. सहा ते सात जणांच्या टोळीतील तीघेजण हे राजस्थानमधील रहिवासी आहेत. या टोळीला मानेवाडातील भवानी गॅस एजन्सीतून घरगुती वापराचे गॅस सिलेंडर व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडमध्ये भरण्यासाठी पुरवला जात होता.

हबीब गुलाम शेख याच्या मालकीच्या या शेतातील गोदामात एका पत्र्याच्या शेडमध्ये या टोळीने बेकायदेशीर कृत्य सुरू केले होते. गोदामावर छापा टाकला त्यावेळी सुनिलकुमार हजमानाराम जानी (४२), प्रकाश बुधाराम खिल्लेरी (२३), श्रवणकुमार राजुराम जानी, तिघेही रा. पल्ली ता. लोहावट जि जोधपूर, राजस्थान, हबीब गुलाम शेख आणि भवानी गॅस एजन्सीचा मालक अशा पाच जणांना पोलिसांनी अटक केली.

गुन्हे शाखा पथक एकने या गोदामातून घरगूती वापरण्याचे एच.पी. कंपनीचे भरलेले सिलेंडर ५९, रिकामे ६९. एच. पी. कंपनीचे व्यावसायिक वापराचे भरलेले ६ , अर्धवट भरलेले सिलेंडर १०, इंडेन कंपनीचे व्यावसायिक भरलेले १०, अर्धवट भरलेले व्यावसायिक ५, भारत कंपनीचे व्यावसायिक वापराचे भरलेले २२, अर्धवट भरलेला १ असे १७९ सिलेंडर जप्त केले.

पथकाला या ठिकाणी दोन नग रिफेलींग मोटार पाईपसह, दोन नग क्षमता वजनाचा काटा, ७ गॅस सिलेंडरचे रेग्युलेटर, सिलेंडर वायू भरण्यासाठी वापरणाले जाणारे ८० नग पाईप, ३ पंप, गॅस सिलेंडर वाहतूकीसाठी वापरजी जाणारी बोलेरो पिकअप जीप, ईतर साहित्य प्लॅस्टिक लेबल,लाखोंची रोख रक्कम असा जवळजवळ ११ लाख २१ हजारांहून अधिक मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

गुन्हे शाखेने जीवनावश्यक वस्तू अधिनियम कलमांतर्गत गुन्हा दाखल करत आरोपींना हिंगणा पोलिसांच्या स्वाधीन केले.

शहरातल्या गॅस एजन्सीमधून निर्जन स्थळावरच्या गोदामात रोज मोठ्या प्रमाणात घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरचा पुरवठा केला जात होता. ही वाहतूक सुरू असताना हिंगणा पोलीसांना हे दिसले नाही, की त्यांनी याकडे जाणीवपूर्वक अर्थपूर्ण दुर्लक्ष केले हे स्पष्टपणे दिसत आहे. घरगुती वापराच्या अनुदानित वायूची राजरोस चोरी होत असताना गॅसची कृत्रिम टंचाई असल्याचे भासवले जात होते. हिंगणा पोलिसांकडून या व्यवहाराला पाठबळ होते यावरून ग्राहकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.